## देशात मंकीपॉक्सचा पहिला रुग्ण?

**नवी दिल्ली :** नुकताच परदेशातून भारतात परतलेल्या एका तरुणाला मंकीपॉक्सचा संसर्ग झाल्याचा संशय आहे. सरकारने योग्य खबरदारी घेत त्याला रविवारी (दि. ८) रुग्णालयात दाखल केले आहे. संबधित संशयित तरुणाला रुग्णालयात विलगीकरणात ठेवण्यात आले आहे. संशयित तरूणाची प्रकृती सध्या स्थिर असून, मंकीपॉक्स विषाणूच्या उपस्थितीची पुष्टी करण्यासाठी रुग्णाच्या नमुन्यांची चाचणी केली जात असल्याची माहिती केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने दिली आहे. याबाबत कोणत्याही मार्गदर्शक सूचना केंद्र सरकाराकडून लागू करण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे कोणीही घाबरून जाऊ नये, असे आवाहन करण्यात आले आहे.


# कृषीवल

रायगड, सोमवार, दि. ९ सप्टेंबर २०२४

किंमत ४ ₹










**आजचा अग्रलेख**

**नितीश व्हायचंय मला**

**वे|ध|क**

## पूजा खेडेकरची हकालपट्टी

**नवी दिल्ली :** वादग्रस्त पूजा खेडकर यांची आयएएसपदावरून हकालपट्टी करण्यात आली आहे. केंद्र सरकारने हा निर्णय जारी केला आहे. आयएएस नियम १९५४ च्या नियम क्रमांक १२ नुसार ही कारवाई करण्यात आली आहे. यूपीएससी आणि दिल्ली पोलिसांनी पूजा खेडकर यांच्या जामिनाला विरोध केला होता. पूजाने फक्त यूपीएससीची फसवणूक केली नसून, परीक्षेच्या संधी संपल्या असतानाही तिने यूपीएससीच्या परीक्षा दिल्या आहेत. पूजा खेडकर सध्या जामिनावर बाहेर असून, तिने ओबीसी आणि दिव्यांग असल्याचे खोटे प्रमाणपत्रही सादर केले होते. यूपीएससी आणि दिल्ली पोलिसांनी पूजा खेडकर यांच्या जामिनाला विरोध केला होता. पूजा खेडकर यांच्या निवडीत मोठा घोटाळा असल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला होता. तसेच पूजासोबत अनेक लोक सहभागी असल्याचा अंदाजही पोलिसांनी व्यक्त केला होता. जुलै महिन्यात यूपीएससीने पूजा खेडकर यांची निवड रद्द ठरवली होती. परीक्षेदरम्यान खोटी कागदपत्र सादर केल्याचा ठपका यूपीएससीने पूजा खेडकर यांच्यावर ठेवला होता.

## लसूण ४०० पार

**आगरदांडा :** मुरुड मुख्य बाजारपेठेत प्रतिकिलो ४०० रुपये लसूण पार झाल्याने पुन्हा जनतेला महागाईचा सामना करावा लागणार आहे. ऐन गणेशोत्सवात भाजीपाल्याचे दरही गगनाला भिडल्याने खिशाला फटका सहन करावा लागत आहे. लसणाची आवक घटल्याने दर वाढल्याचं स्थानिक व्यापाऱ्यांकडून सांगण्यात येत आहे. तसेच येत्या काळात लसूण आवक आणखी कमी होण्याचा अंदाज ही वर्तविण्यात आल्याने लसणाचे दर ५०० रुपये पार करणार, असा अंदाज स्थानिक व्यापारी करीत आहेत. दिवसेंदिवस लसणाचे भाव वाढत असल्याने हे भाव पुन्हा वाढू नये त्याआधीच लसूण खरेदी करताना नागरिक दिसत आहेत. त्याचबरोबर कांद्याचे दर प्रतिकिलो ४० रुपयांवरुन ७० रुपये झाला आहे.

## रेल्वेच्या धडकेने एकाचा मृत्यू

**कोलाड :** रोहा तालुक्यातील गोवे आदिवासीवाडी येथील दौलत रामू वाघमारे हा गोवे गावाच्या हद्दीत शनिवार, दि. ७ सप्टेंबर रोजी चार वाजण्याच्या सुमारास गोवे गावाच्या हद्दीतील रेल्वे ट्रकच्या बाजुला बकऱ्या चरण्यासाठी गेला होता. दरम्यान, रोहा बाजूकडून कोलाड बाजूकडे जाणाऱ्या मालगाडीने त्याला जोरदार धडक दिली. या अपघातात त्याच्या डोक्याला मोठी दुखापत झाल्यामुळे त्याचा मृत्यू झाला. या अपघाताची माहिती मिळताच कोलाड पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक नितीन मोहिते घटनास्थळी दाखल झाले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली आबा गायकवाड अधिक तपशील तपास करीत आहेत.

### घर नावावर करण्याचा वाद, सख्ख्या भावानेच भावाचं कुटुंब संपवलं?

# तिघांची हत्या; कर्जत हादरलं !

**| नेरळ | प्रतिनिधी |**

**कर्जत तालुक्यातील चिकनपाडा या गावाच्या बाहेर असलेल्या पोशिर पाडा येथे तिघांची हत्या करण्यात आली आहे. पती-पत्नी आणि एका लहान मुलाचा खून करण्यात आला असून, याप्रकरणी संशयित म्हणून मयत तरुणाच्या भावाला ताब्यात घेण्यात आले आहे. तर, विवाहित महिला ही सात महिन्यांची गरोदर असून, त्या आरोग्य विभागात आशासेविका म्हणून कार्यरत होत्या. दरम्यान, घरात गणपती बाप्पाची प्रतिष्ठापना झालेली असताना मध्यरात्री तिघांचे खून झाल्याने कर्जत तालुका हादरला आहे.**





नेरळ-कळंब राज्यमार्ग रस्त्यावर चिकनपाडा हे मुस्लिमबहुल गाव असून, या गावाला लागून पोशीर पाडा येथे हिंदूंची लहानशी वस्ती आहे. त्या ठिकाणी १५ वर्षांपूर्वी कळंबजवळील बोरगाव येथील जैतू पाटील यांनी जमीन खरेदी केली होती आणि त्या ठिकाणी घर बांधून ते कुटुंब राहू लागले. जैतू पाटील यांच्या मदन आणि हनुमंत या दोन्ही मुलांची लग्नेदेखील चिकनपाडामधील पोशीर पाडा येथील घरी झाली आहेत. १३ वर्षांपूर्वी जैतू पाटील यांच्या मोठ्या मुलाचे मदन पाटील यांचे लग्न झाल्यानंतर जैतू पाटील हे आपल्या पत्नीसह बोरगाव येथे राहायला गेले. त्यामुळे त्या घरात मदन तसेच त्याची पत्नी मुलगा आणि भाऊ हनुमंत जैतू पाटील असे कुटुंब राहात होते. हनुमंत हा गवंडी काम करायचा, तर मदन पाटील याची पत्नी अनिशा या तेथे आरोग्य विभागात आशासेविका म्हणून काम करीत होत्या.

जैतू पाटील यांनी बांधलेले घर हे मदन जैतू पाटील यांच्या नावे होते. त्यामुळे वडिलांनी बांधलेल्या घराचा अर्धा भाग आपल्या नावावर करून देण्यात यावा यासाठी हनुमंत हा आपला भाऊ मदनसोबत सातत्याने वाद घालत होता. यावर्षी त्यांच्या घरात पान २ वर

- तरुणाचा मृतदेह घरातच रक्ताच्या थारोळ्यात
- नदीत सापडले मायलेकाचे मृतदेह
- मृताच्या भावाला चौकशीसाठी घेतले ताब्यात

### मृत महिला सात महिन्यांची गरोदर

मृत महिला अनिशा या सात महिन्यांच्या गरोदर होत्या. तसेच त्या स्थानिक पातळीवर पोशीर ग्रामपंचायतीमध्ये आरोग्य विभागाच्या आशासेविका म्हणून सेवा देत होत्या.

### अर्धे घर नावावर करत नाही म्हणून खून?

अनिशा पाटील यांचे माहेर हे याच चिकनपाडा गावापासून दीड किलोमीटर अंतरावरील माले गावातील आहे. त्या मृत विवाहितेचा भाऊ रुपेश वेहले यांनी नेरळ पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. त्यात त्यांनी अर्धे घर नावावर करीत नाही म्हणून हनुमंत पाटील यानेच त्या तिघांना ठार केले असल्याचा दावा केला आहे.

## आमच्या जमिनी परत करा

**■ सेझ प्रकल्पग्रस्त आक्रमक, रद्द झालेली सुनावणी ११ सप्टेंबरला**

**| पेण | प्रतिनिधी |**

महामुंबई सेझसाठी पेण, उरण, पनवेल येथील हजारो शेतकऱ्यांच्या जमिनी १७ ते १८ वर्षांपूर्वी संपादित करण्यात आल्या होत्या. मात्र, एवढी वर्षे उलटून गेली तरी कोणत्याही प्रकारचा प्रकल्प त्या जमिनींवर अस्तित्वात न आल्याने या जमिनी पुन्हा शेतकऱ्यांना परत कराव्यात, अशी मागणी गेली तीन-चार वर्षे पेण, उरण, पनवेल तालुक्यात होत आहे. याच मुद्द्यावर शेकापचे माजी आमदार जयंत पाटील यांनीही विधिमंडळात आवाज उठवून शेतकऱ्यांच्या जमिनी तातडीने परत कराव्यात, अशी मागणी केली आहे.

दरवेळेला काही ना काही अडथळा येऊन अंतिम निर्णय काही होत नाही. गेल्या १८ महिन्यांपासून जिल्हाधिकाऱ्यांकडे सेझविषयी जमिनींचा निर्णय व्हावा म्हणून शेतकरी पाठपुरावा करत आहेत. परंतु, त्यावर कारवाई होत नाही. लवकरात लवकर निर्णय व्हावा म्हणून पान २ वर

### शेकापने उठवला आवाज

**सेझ प्रकल्पासाठी संपादित केलेल्या जमिनी प्रकल्प उभारला गेला नसल्याने शेतकऱ्यांना परत करुन सातबारा कोरा करण्यात यावा, यासाठी शेतकरी कामगार पक्षाचे माजी आ. जयंत पाटील यांनी विधिमंडळात लक्षवेधी मांडून सरकारला उत्तर देण्यास भाग पाडले होते.**

## दीड दिवसांच्या बाप्पाला भावपूर्ण निरोप

**११ सार्वजनिक, तर २७ हजार गणेशमूर्तींचे विसर्जन; गणेशभक्तांच्या उत्साहाला उधाण**

**| रायगड | खास प्रतिनिधी |**

दीड दिवसांच्या बाप्पाला भक्तीमय वातावरणात रविवारी (दि. ८) निरोप देण्यात आला. तब्बल ११ सार्वजनिक, तर २७ हजार गणेशमूर्तींचे विसर्जन करण्यात आले. शनिवारी जिल्ह्यात गणेशोत्सवाला धूमधडाक्यात सुरुवात झाली. तब्बल एक लाख गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना करण्यात आली. परंपरेनुसार टाळ, मृदुंगाच्या गजरात दीड दिवसांच्या बाप्पाच्या मूर्तींचे विधीवत विसर्जन करण्यात आले.



बाप्पाच्या उत्सवाची चांगलीच धूम असल्याचे दिसून आली. शनिवारी बाप्पाचे आगमन झाले. त्यावेळी भक्तांनी विविध वाद्यांसह डिजेच्या तालावर नाचत बाप्पाला घरी आणले होते. आज दीड दिवसांचा पाहुणचार घेऊन बाप्पा आपल्या गावाला रविवारी निघूनगेले. दुपारनंतर अलिबाग, पेण, पनवेल, उरण, कर्जत, खालापूर, रोहा, माणगाव, म्हसळा, तळा, महाड, श्रीवर्धन, पोलादपूर, सुधागड, मुरुड अशा १५ तालुक्यांत विसर्जनाची लगबग सुरु झाली होती. दीड दिवसांचा पाहुणचार घेतल्यानंतर टाळ, मृदुंगाच्या गजरासह डिजे आणि ढोल-ताशांच्या तालावर दीड दिवसांच्या बाप्पाला निरोप देण्यात आला. समुद्रकिनारे, नदी, तलाव, कृत्रिम तलाव तसेच घरच्या घरी बाप्पाच्या मूर्तींचे पान २ वर

## मणिपूरमध्ये हिंसाचाराचा भडका

### गोळीबारात पाच जणांचा मृत्यू

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

मणिपूरच्या जिरीबाममध्ये पुन्हा एकदा हिंसाचार उफाळून आला आहे. शनिवारी झालेल्या गोळीबारात पाच जणांचा मृत्यू झाला असल्याची माहिती पोलिसांनी दिली. एका व्यक्तीचा झोपेतच, तर त्यानंतर झालेल्या गोळीबारात चार सशस्त्र फुटीरतावादी ठार झाले.

दरम्यान, पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मणिपूरमध्ये शनिवारी पुन्हा एकदा हिंसाचार भडकला. जिरीबाम जिल्ह्यात बंदूकधाऱ्यांनी एका वृद्ध व्यक्तीची झोपेत असताना गोळी मारुन हत्या केली. जिरीबामच्या डोंगरी भागात दोन समुदायात गोळीबार झाला. या धुमश्चक्रीत चार जण ठार झाले. एका पोलीस अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, फुटीरवाद्यांनी जिरीबाम जिल्हा मुख्यालयापासून सुमारे पाच किमी अंतरावर राहणाऱ्या व्यक्तीची झोपेत असताना गोळ्या झाडून हत्या केली.

## माझा जीव आरक्षणात, सरकारचा सत्तेत

**मनोज जरांगेंचा जोरदार हल्लाबोल**

**| बीड | प्रतिनिधी |**

आपल्याला आरक्षणाची लढाई जिंकायची आहे. म्हणून या घोंगडी बैठकीचे आयोजन केले जात आहे. मराठ्यांना आरक्षण मिळणे गरजेचे आहे. आरक्षणापासून मराठ्यांचे एकही घर वंचित राहिले नाही पाहिजे. आपला लढा अंतिम टप्प्यात आणून ठेवला आहे. सरकारसमोर आता पर्याय नाही. माझा जीव आरक्षणात आहे, तर सरकारचा जीव सत्तेत आहे, असा हल्लाबोल मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी रविवारी (दि. ८) सरकारवर केला. बीडमधील परळी वैजनाथ येथील घोंगडी बैठकीतून त्यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांवरदेखील निशाणा साधला आहे.



ते म्हणाले की, आपल्याला आरक्षण मिळालं नाही तर सरकारला सत्ता मिळू द्यायची नाही. देवेंद्र फडणवीसांनी सापळा रचला आहे. चार दिवसाला नवीन बैल येतो. मी फडणवीसांना एकच सांगतो, मराठ्यांचा नाद सोडून द्या, नाहीतर राज्यात भाजपा राहायचं नाही. दरम्यान, निवडणुकीआधी राज्य सरकार काही निर्णय घेतयं का? हे पाहणं महत्त्वाचे ठरणार आहे.

## अल्पवयीन मुलीवर अत्याचार करुन खून

**| जळगाव | प्रतिनिधी |**

कोलकाता आणि बदलापूर अत्याचार प्रकरणानंतर संपूर्ण महाराष्ट्रात संतापाची लाट उसळली होती. महिला अत्याचाराच्या प्रकरणात वाढ होताना दिसत आहे. जळगावात एका अल्पवयीन मुलीवर अत्याचार करत तिची हत्या करण्यात आल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. या घटनेने जळगावात एकच खळबळ उडाली आहे.

गणरायाच्या स्थापनेच्या दिवशीच चोपडा तालुक्यातील एका १२ वर्षीय मुलीवर अत्याचार करुन तिची हत्या करण्यात आल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे. पोलिसांना मिळालेल्या माहितीनुसार, नराधमाने सुरुवातीला तिच्यावर अत्याचार केला, त्यानंतर डोक्यात दगड घालून तिची पान २ वर

**घरत दाम्पत्याने साकारला गाळ काढण्याचा देखावा**

# गणेशोत्सवात उमटे धरण संघर्षाची छाप

### दिवी पारंगीत सजावट पाहण्यासाठी भाविकांची गर्दी

**| रायगड | खास प्रतिनिधी |**

गणेशोत्सवामध्ये खासगी तसेच सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ बाप्पासाठी आकर्षक आरास, सजावट करतात. काही ठिकाणी सामाजिक आशय असणारे संदेश देण्याचा प्रयत्न असतो. अशीच एक भन्नाट शक्कल अलिबाग तालुक्यातील दिवी-पारंगी येथील भारत घरत आणि सुप्रिया घरत या दाम्पत्याने लढवली आहे. उमटे धरणातील गाळ काढण्याच्या संघर्षाचा प्रवास त्यांनी साकारलेल्या चलचित्र देखाव्यातून मांडला आहे. याबाबत तालुकाभर याच देखव्याची चर्चा असून, मोठ्या संख्येने भाविक बाप्पाच्या दर्शनाबरोबरच देखावा पाहण्यासाठी गर्दी करत आहेत.



अलिबाग तालुक्यात रामराज परिसरामध्ये उमटे धरण आहे. १९७८ साली या धरणाची निर्मिती करण्यात आली होती. पावसाळ्यात या धरणामध्ये पाऊस पडल्यानंतर ते धरण तुडुंब भरते. या पाण्यावर परिसरातील ४७ गावे आणि ३३ आदिवासी वाड्यांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा केला जातो. सध्या या धरणाची परिस्थिती अतिशय बिकट झालेली आहे. धरणाच्या भिंतीला ठिकठिकाणी भगदाड पडले आहे. तसेच फिल्टर प्लाँट बंद पडला आहे. धरणात गाळ साचल्याने पाण्याच्या साठ्यात कमालीची घट झाली होती. २०१७ सालापासून धरणातील गाळ काढण्यासाठी सरकारी यंत्रणांबरोबर पत्रव्यवहार करण्यात आला होता. मात्र, सरकारी यंत्रणेने नागरिकांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नाला फाट्यावर मारले. पान २ वर

### शेकापचे योगदान मोलाचे

**तरुणांनी केलेला संघर्ष प्रत्येकाच्या मनात रुजावा आणि त्यातून समाजाला प्रेरणा मिळावी, हा त्यांचा उद्देश असल्याचे ॲड. राकेश पाटील यांनी सांगितले. अलिबागचे शेकापचे माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक, शेकापच्या महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील, नृपाल पाटील यांनी दिलेले योगदान न विसरता येणार आहे. उमटे धरण परिसरातील सर्व ग्रामस्थ आम्ही त्यांचे ऋणी आहोत, असेही ॲड. पाटील यांनी स्पष्ट केले.**




# मोकाट जनावरांचा बंदोबस्त कागदावरच

## वाहतुकीला अडथळा; अपघाताचे सातत्य कायम

। दिघी । वार्ताहर ।

श्रीवर्धन तालुक्यातील बोर्लीपंचतन परीसरात मोकाट जनावरांचा सुळसुळाट झाला असून, याची तक्रार सातत्याने येत असताना संबंधितांना समस्या सोडवण्यात अपयश आले आहे. मात्र, या जनावरांचा वेळेत बंदोबस्त न झाल्यास या गणेशोत्सवात रस्त्यांवरील पादचारी व वाहनचालकांच्या डोक्यावर अपघाताची टांगती तलवार कायम असणार आहे.



### कामे झालं की देतात सोडून

**बोर्लीपंचतन शहर व लगतच्या गावातील काही व्यावसायिक रोजगार मिळवण्यापुरताच वापर करतात. त्यानंतर या गुरे, अश्वांना पोसणे त्यांना परवडत नसल्याने ती मोकाट सोडून दिली जातात. ही जनावरे दिवस-रात्र शहरात भटकत असतात.**

रस्त्यांवर मोकाट सोडून वाहतूक व नागरिकांना अडचण निर्माण करणाऱ्या जनावरांना अटकाव करण्यात यावा, अशी मागणी कित्येक दिवसांपासून होत आहे. तसे बंदोबस्त व्हावा म्हणून नियमावली ठरवत कारवाईचे परिपत्रक ग्रामपंचायतीकडून काढण्यात आले. मात्र, याला न जुमानता गुरांचे मालक बिनधास्तपने जनावरांना मोकाट सोडून देत आहेत.

बोर्लीपंचतन गावातून जाणाऱ्या दिवेआगर, श्रीवर्धन मुख्य मार्गावर पोहा मिल नाक्यावर दिवसरात्र मोकाट जनावरांचा उपद्रव वाढला आहे. रात्रीच्या वेळी शहराच्या अंतर्गत रस्त्यांवर मोकाट गुरे ठाण मांडून असतात. त्यामुळे त्यांना धडकून अपघात होण्याच्या घटना घडत आहेत. अनेक वेळा वाहतुकीचाही खोळंबा होतो. शहरात गेली अनेक वर्षे मोकाट गुरांचा उपद्रव होत असताना अश्वांसह श्वानांची ही संख्या वाढत असूनही त्यावर ठोस उपाययोजना होत नाही.

आता गणेशोत्सवात शहरात रहदारी नेहमी पेक्षा जास्त वाढली आहे. त्यात मोकाट जनावरांचा उच्छाद वाढल्याने नागरिकांना मोठ्या प्रमाणात मनस्ताप सहन करावा लागत आहे. कारण, भर रस्त्यात वारंवार जनावरांच्या धावाधाव होत असल्याने नागरिकांची धावपळ उडते. यामध्ये बेसावद पादचाऱ्यांना दुखापत झाल्याची अनेक घटना येथे घडल्या आहेत. बोर्लीपंचतन शहरातून जाणाऱ्या मार्गावर मोकाट जनावरांचे वास्तव्य असल्याने नेहमीच रहदारीला अडथळा होत असल्याने पादचाऱ्यांना उपद्रव सहन करावा लागतो. या मोकाट जनावरांचा बंदोबस्त करण्यात यावा, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# खड्ड्यांचा त्रासदायक प्रवास

। कोर्लई । वार्ताहर ।

मुरुड तालुक्यातील साळाव -चोरढे रस्त्यावरील बुजविण्यात आले खड्डे पुन्हा उखडले असून, रस्त्यांची अवस्था जैसे थे झाली आहे. त्यामुळे या रस्त्यावरील बाप्पाचा प्रवास खडतर झाल्याने सार्वजनिक बांधकाम खात्याच्या कामाबाबत गणेशभक्तांकडून नाराजीचा सूर दिसून येत आहे.

साळाव-रोहा मार्गावर अनेक दिवसांपासून साळाव, चेहेर, वाघुळवाडी, आमली, येसदे, शिरगाव, वळके, सातिर्डे, चोरढे रस्त्यावर पडलेले खड्डे गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर दगड माती टाकून बुजविण्यात आले होते. दरम्यानच्या काळात पावसाने पुन्हा याठिकाणी जैसे थे अवस्था झाल्याने सार्वजनिक बांधकाम खात्याने बुजविण्यात आलेले खड्डे वरवरची मलमपट्टी ठरली. या रस्त्यावरील खड्ड्यांमुळे राजीचा सूर दिसून येत आहे. तात्काळ खड्डे बुजविण्याची मागणी होत आहे.



### साळाव-चोरढे रस्त्यावरील खड्डे पुन्हा जैसे थे

### बांधकाम खात्याची वरवरची मलमपट्टी

### उपअभियंत्याची उडवाउडवीची उत्तरे

**आमच्या प्रतिनिधीने मुरुड सार्वजनिक बांधकाम विभागाच्या उपअभियंता रमेश गोरे यांच्याशी भ्रमणध्वनीवर संपर्क साधला असता, मी वैद्यकीय (मेडिकल) रजेवर आहे.तुम्हाला बातमीत काय टाकायचे ते टाका असे सांगितले. येथील उपअभियंता रमेश गोरे यांचा सेवानिवृत्ती कालावधी जवळ आला असल्याचे व ते कार्यालयात अनेकवेळा भेटत नसल्याने त्यांना सेवानिवृत्तीपर्यंत अन्य ठिकाणी बदली किंवा रजेवर पाठविण्यात यावे व याठिकाणी नवीन उपअभियंता यांना संधी देण्यात यावी, अशी भावना जनमानसातून व्यक्त केली जात आहे.**

# रेडिमेड मोदकांना ‘अच्छे दिन’

। पनवेल । वार्ताहर ।

लाडक्या बाप्पाचे आगमन काही तासांवर येऊन ठेपल्याने सार्वजनिक मंडळांसह घरोघरी चैतन्य अवतरले असून, गणेशोत्सवासाठी आवश्यक असणाऱ्या साहित्यालादेखील मागणी वाढल्याचे दिसून येत आहे. मोदक त्यापैकी प्रमुख असून, सध्या बाजारात उपलब्ध असलेल्या मोदकांच्या विविध प्रकारांना वाढती मागणी असल्याने मोदक विक्रेत्यांना जणू गणपत्ती बाप्पा पावल्याची स्थिती आहे.

महाराष्ट्रात सर्वात मोठा सण म्हणजे गणेशोत्सव. गणपती बाप्पाला मोदक प्रिय असल्याने गणेशपजनात मोदकांना विशेष मान आणि स्थान असते. मात्र, आजच्या शहरी आणि धकाधकीच्या जीवनात गृहिणींना मोदक तयार करण्यास वेळ अपुरा पडत आहे. त्यामुळे मागील काही वर्षांपासून गृहिणी तयार मोदकांवर भर देत आहेत. त्यामुळे बाजारात खोबरे, मलई, चॉकलेट, आंबा, उकडी, खवा, पेढा, काजू, शुगर फ्री मोदक, केक मोदक अशा विविध प्रकारांत रुचकर मोदक उपलब्ध होत आहेत. बाजारात मिळणारे मोदक अत्यंक सुबक आणि वैशिष्ट्यपूर्ण असल्याने अशा मोदकांना भक्तांकडून वाढती मागणी दिसून येत आहे. त्यामुळे मोदक बनविण्याच्या उद्योगाला सध्या ‘अच्छे दिन’ आले आहेत.

सेंद्रिय मोदकांना मागणी...

बाजारात सध्या सेंद्रिय मोदकही विक्रीला आले आहेत. या मोदकांमध्ये कोणत्याही प्रकारच्या रासायनिक पदार्थांचा वापर केलेला नसतो. असे मोदक आरोग्याच्या दृष्टीनेही चांगले असतात. सेंद्रिय मोदकांची जाहिरात सोशल मिडीयावर झळकत असल्याने या मोदकांना वाढती मागणी असल्याचे चित्र दिसून येत आहे. सेंद्रिय मोदकांत हापूस आंब्याच्या रसापासून बनविलेल्या मोदकांचीही चलती आहे, अशी माहिती महिला उद्योजिका मेघना कदम यांनी दिली.



### रोजगाराच्या संधीत वाढ

**गणेशोत्सवात घरोघरी गणेशपूजेसाठी संपूर्ण १० दिवस मोदकांना मोठा मान असल्याने विविध व्यावसायिकांनी मोठ्या प्रमाणात विविध प्रकारच्या मोदकांचे आगाऊ उत्पादन केलेले आहे. खवा, पेढा, आमरस, मलई, खोबरे या पदार्थांपासून तयार केलेल्या मोदकांना मोठी मागणी आहे. काही महिला गृह उद्योगांसह बचतगटांनाही मोदकांमुळे ‘अच्छे दिन’ आले आहेत. उकडीचे मोदक, तळलेले मोदक, क्लासिक मावा मोदक, पिनाकोलाडा मोदक आदी विविध प्रकारचे मोदक बाजारात उपलब्ध आहेत.**

# ज्येष्ठ नागरिकाची फसवणूक

। पनवेल । वार्ताहर ।

अनोळखी नंबरवरुन आलेल्या लिंकवर क्लिक करणे खारघरमधील ज्येष्ठ नागरिकाला चांगलेच महागात पडले आहे. या ज्येष्ठ नागरिकाने ज्या लिंकवर क्लिक केले, त्या लिंकच्या माध्यमातून सायबर चोरट्यांनी त्यांच्या बँक खात्यातून ३.५१ लाखांची खरेदी करुन त्यांची फसवणूक केल्याचे उघडकीस आले आहे. खारघर पोलिसांनी या प्रकरणातील सायबर चोरट्याविरोधात फसवणुकीसह आयटी ॲक्टनुसार गुन्हा दाखल केला आहे.

या प्रकरणातील तक्रारदार संजीव पानसे (६७) खारघर, सेक्टर-५ मध्ये राहण्यास आहेत. पानसे घरी असताना, त्यांच्या मोबाईलवर सायबर चोरट्यांनी मेसेज पाठवून ॲक्सीस बँकेकडून त्यांना ८९७० रिवार्ड मिळाल्याचे आणि त्याची मुदत आज संपत असल्याचे तसेच सदर रिवॉर्ड मिळवण्यास दिलेल्या लिंकवर क्लिक करण्यास सांगण्यात आले होते. सदरचा मेसेज अक्सीस बँकेकडून पाठविण्यात आला असावा, असे वाटल्याने पानसे यांनी मेसेजमधील सूचनेप्रमाणे लिंकवर क्लिक केले. त्यांनतर काही वेळातच सायबर चोरट्यांनी पानसे यांच्याकडून घेतलेल्या माहितीचा वापर करुन आर्थिक व्यवहार करण्यास सुरुवात केली. याबाबतचे आलेले ओटीपी पानसे यांनी त्यात टाकले. याचवेळी त्यांच्या खात्यातून १.५३ लाख रुपये तर त्यांच्या पत्नीच्या खात्यातून १.९८ लाख रुपये डेबीट झाल्याचे मेसेज त्यांना आले. त्यानंतर पानसे दाम्पत्याने बँकेत जाऊन चौकशी केली असता, त्यांच्या खात्यातून ३.५१ लाख रुपयांची रक्कम चोरट्यांनी काढल्याचे सांगण्यात आले.

## मोटारसायकलचा अपघात

**पनवेल :** टी पॉईंटकडून पळस्पेकडे जाणाऱ्या रोडवर दुचाकीवरील नियंत्रण सुटल्याने करंजाडे येथील सेवा रस्त्यावरील दुभाजकाला दुचाकी धडकून दुचाकीचा अपघात झाला. या अपघातात दुचाकीस्वार हा गंभीररित्या जखमी होऊन मयत झाला आहे. तर त्याच्याबरोबर असलेली महिला जखमी झाली आहे. राहूल राजवर्धन (२८) व त्याची मैत्रीण सिनीया कांबळे (२६) पनवेलकडे येत होते.

# नळपाणी योजनेचे कनेक्शन जोडले

। नेरळ । प्रतिनिधी ।

नेरळ ग्रामपंचायतीचे नळपाणी योजनेचे वीज बिल थकीत असल्याने महावितरण कंपनीने वीज जोडणी एक सप्टेंबर रोजी कापली होती. ग्रामपंचायतीने महावितरणचे ७६ लाखांचे बिल थकविले असून, महावितरण कंपनीकडून वीज कनेक्शन कापले आहे.

नेरळ ग्रामपंचायतीचे थकीत वीज बिल आणि वीज जोडणी कापण्याच्या घटनेचे पडसाद ग्रामसभेत ग्रामस्थांनी जोरात गदारोळ केला होता. त्यात गणेशोत्सव जवळ आल्याने नेरळ गावातील शिवसेनेच्या कार्यकर्त्यांनी आमदार महेंद्र थोरवे यांची भेट घेतली. त्यावेळी गणेश उत्सव काळात नेरळ गावातील रहिवाशांना पाणीपुरवठा करण्यात अडचणी निर्माण झाल्या आहेत याची माहिती देवून या प्रकरणी लक्ष घालण्याची विनंती आमदार महेंद्र थोरवे यांना करण्यात आली. आमदार थोरवे यांनी महावितरण कंपनीचे अधिकारी यांना बोलावून घेत नेरळ ग्रामपंचायतचे वतीने बिल भरण्यासाठी एक महिन्याची मुदत देण्याची सूचना केली. त्यानंतर वीज पुरवठा पूर्ववत करण्याचा निर्णय महावितरण कंपनीने घेतला आहे.

रात्री आठ वाजता महावितरण कंपनीचे सहायक अभियंता यांनी कापलेली वीज जोडणी बोरले येथील पंप गृह येथे येऊन जोडून दिली. त्यावेळी शिवसेना शहर प्रमुख प्रभाकर देशमुख, ग्रामसेवक अरुण कारले, उपशहर प्रमुख सचिन खडे, मुबा नजे, विकी कटारिया, मनोज मानकामे सचिन जाधव, प्रमोद कराळे, देवा दाबणे, सूरज साळवी, ऋषी पाटील व महावितरण आणि ग्रामपंचायतीचे कर्मचारी उपस्थित होते.

## सेन्सेक्स घसरला

**मुंबई :** शेअर बाजारात गेल्या काही सत्रांपासून सुरू असलेल्या तेजीला शुक्रवारी मोठा धक्का लागला. आठवड्याच्या शेवटच्या दिवशी मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक सेन्सेक्समध्ये १,०१७ अंशांची घसरण होऊन ८१,१८३ वर स्थिरावला. तर, राष्ट्रीय शेअर बाजाराचा निर्देशांक निफ्टीमध्येही २९२.९१ अंशांची घसरण होऊन २४,८५२ पातळीवर बंद झाला. दोन्ही निर्देशांकात मोठी घसरण झाल्यानंतर गुंतवणूकदारांना पाच लाख कोटींच्या नफ्यावर पाणी सोडावे लागले.

पान १ वरून

## तिघांची हत्या; कर्जत हादरलं!

पहिल्यांदा गणपती बाप्पाचे आगमन झाले होते. मात्र, हनुमंतने आपल्या पत्नीला माहेरी भडवळ येथे पाठवून दिले होते. सात सप्टेंबरच्या रात्री त्या दोन्ही भावांमध्ये वाद झाल्याचे बोलले जात होते. सकाळी दहा वाजता नेरळ-कळंब रस्त्यावरील नाल्यात विवेक मदन पाटील या दहा वर्षांच्या मुलाचा मृतदेह आढळून आला. स्थानिकांनी त्यानंतर त्या मुलाच्या आईबाबांची चौकशी करण्यास सुरुवात केली असता त्याच नाल्यात अनिशा मदन पाटील यांचा मृतदेह आढळून आला. त्यानंतर ग्रामस्थांनी या कुटुंबाच्या घराकडे धाव घेतली.

घरी गेल्यावर सर्वांना धक्का बसला. कारण, घरात मदन जैतू पाटील यांचा मृतदेह रक्ताच्या थारोळ्यात आढळून आला. तोपर्यंत नेरळ पोलीस तेथे पोहोचले होते. घटनास्थळी काही वेळाने पोलीस उपअधीक्षक धूळदेव टेले हेदेखील पोहोचले. सर्व तिन्ही मृतदेह पोलिसांनी शवविच्छेदन करण्यासाठी कर्जत येथील उपजिल्हा रुग्णालयात पाठवले असून, या घटनेचा तपास नेरळ पोलीस करीत आहेत. नेरळ पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाने त्या घरातील चौथा सदस्य असलेल्या हनुमंत जैतू पाटील यास संशयित म्हणून चौकशीसाठी ताब्यात घेतले आहे. या घटनेने कर्जत तालुका हादरला असून, याच पोशीर पाडामध्ये आठ वर्षांपूर्वी कर्जत येथील तरुणाचा खून अनैतिक संबंधातून झाला होता आणि आजच्या घटनेने त्या खुनाच्या प्रकरणाला पुन्हा उजाळा मिळाला आहे.

**शवविच्छेदनानंतर होणार खुलासा**

पोलिसांनी याप्रकरणी धडक कारवाई करताना संशयित म्हणून एकाला ताब्यात घेतले आहे. मात्र, या प्रकरणाचा उलगडा शवविच्छेदन अहवाल प्राप्त झाल्यावर होण्याची शक्यता आहे.

## अल्पवयीन मुलीवर अत्याचार करुन खून

हत्या करण्यात आली आहे. या घटनेने परिसरात संताप व्यक्त करण्यात येत आहे. तसेच नराधमाला कठोरात कठोर शिक्षा करण्यात यावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. पोलिसांनीही पाशवी अत्याचार व खून करुन पळून जाणाऱ्या नराधमाला ताब्यात घेतलं आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अल्पवयीन मुलगी ही शेतात कामासाठी गेली होती. संध्याकाळी शेतातून काम करुन घरी येत असताना नराधमाने बळजबरीने तिला ओढून शेतात नेले. तिथे तिच्यावर अत्याचार करण्यात आला. त्यानंतर कोणालाही कळू नये यासाठी तिच्या डोक्यात दगड घालून तिची निर्घृणपणे हत्या करण्यात आली. धक्कादायक म्हणजे, पीडित मुलीच्या लहान बहिणीसमोर हा सगळा प्रकार घडला होता. त्यानंतर लहान बहिणीने गावात जाऊन सगळ्यांना घडलेली हकिकत सांगितली तेव्हा हा प्रकार उघडकीस आला आहे. याबाबत अधिक तपास पोलीस करीत आहेत.

## दीड दिवसांच्या बाप्पाला भावपूर्ण निरोप

विसर्जन करण्यात आले. भक्त गणेशमूर्तींच्या विसर्जनासाठी मोठ्या संख्येने बाहेर पडले होते. त्यांच्या चेहऱ्यावर उत्साह प्रचंड प्रमाणात ओसंडून वाहत असल्याचे दिसून आले.

मिरवणुकीत कोणी भजने गाऊन चांगलीच रंगत वाढवली. ‘गणपती बाप्पा मोरया’च्या जयघोष सर्वत्र निनादत होता. त्यामुळे वातावरण चांगलेच भक्तीमय झाले होते. अलिबाग शहरामध्ये भक्तांच्या उत्साहाला चांगलेच उधाण आले होते. विसर्जनसाठी मोठ्या संख्याने समुद्रकिनारी, तलाव, नदी या ठिकाणी गर्दी झाली होती. सकाळपासून आकाशात चांगलेच धग दाटून आले होते. त्यामुळे विसर्जन मिरवणुकीवर परिणाम होईल, अशी भीती भाविकांना वाटत होती. मात्र, दुपारनंतर आकाश मोकळे झाले आणि भक्तांना हायसे वाटले. चारचाकी वाहनांसह रिक्षा, टेम्पो तर कोणी बाप्पाची मूर्ती डोक्यावर घेऊन विसर्जन ठिकाणी नेत होते.

विसर्जन ठिकाणी गर्दी न करण्याचे आवाहन स्थानिक प्रशासानामार्फत करण्यात येते होते. विसर्जनाच्या ठिकाणी पालिकेने मदत केंद्र सुरु केले होते. ध्वनीक्षेपकावरुन सातत्याने सूचनांचे पालन करण्याचे आवाहन भक्तांना करण्यात येत होते.

अलिबाग शहरामध्ये समुद्रकिनारी विसर्जनासाठी होणारी गर्दी लक्षात घेऊन अलिबाग पोलिसांनी शहरातील प्रमुख रस्त्यांवर बॅरिकेट्स लावले होते. तेथे विसर्जनसाठी येणारी वाहने, रुग्णवाहिका यांनाच प्रवेश देण्यात येत होता. अन्य वाहनांची वाहतूक नवीन पोस्ट ऑफिसमार्गे वळवण्यात आली होती.

समुद्रकिनारी भेळपुरी, पाणीपुरी, विविध खाद्यपदार्थांचे स्टॉल दिसत होते. या ठिकाणी खवयांची गर्दी दिसून आली. प्रशासनासह विविध सामाजिक संस्थांनी निर्माल्य गोळा करण्यासाठी कलश ठेवेल होते.

## आमच्या जमिनी परत करा

शेतकऱ्यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. दरम्यान, महसूल खात्याने मान्यदेखील केले की, जमिनींवर बोजा ठेवून जमीन मूळ मालकाला परत करण्यात येईल. परंतु, तसे काही झाले नाही. अखेर यामध्ये उच्च न्यायालयाला हस्तक्षेप करावा लागला.

**जिल्हाधिकाऱ्यांना तंबी**

उच्च न्यायालयाने रायगड जिल्हाधिकाऱ्यांना चार आठवड्यांत निर्णय देण्याची तंबी दिली आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी चार सप्टेंबर रोजी सुनावणीची तारीख निश्चित केली होती. परंतु, रायगडच्या खासदार महोदयांच्या बैठकीत जिल्हाधिकारी जास्त वेळ थांबल्याने ती सुनावणी झाली नाही.

**शेतकऱ्यांच्या प्रश्नाकडे पाठ**

शेतकऱ्यांच्या प्रश्नांपेक्षा जिल्हाधिकाऱ्यांना खासदारांबरोबरची बैठक महत्त्वाची वाटली. त्यामुळे त्यांनी शेतकऱ्यांची सुनावणी रद्द करून खासदारांबरोबर राहणे पसंत केले. उच्च न्यायालयाच्या आदेशामुळे जिल्हाधिकाऱ्यांना तातडीने पुन्हा तारीख देणे क्रमप्राप्त होते. त्यामुळे येत्या बुधवारी ११ तारखेला सेझ जमिनीसंदर्भात सुनावणी होणार आहे.

## गणेशोत्सवात उमटे धरण संघर्षाची छाप

परिसरातील नागरिकांच्या पाण्याचा प्रश्न सुटवा यासाठी चिंचोटीचे ॲड. राकेश पाटील यांनी धरण क्षेत्रातील तरुणांची मोट बांधली. त्यांनी उमटे धरण संघर्ष ग्रुपची निर्मिती केली. त्यानंतर अलिबागमधील पत्रकारांच्या मदतीने जिल्हा प्रशासनावर दबाव आणला. प्रशासनाने धरणातील गाळ काढण्याला परवानगी दिली. यासाठी समाजातून मदतीचे हात पुढे आले. अलिबागमधील शेकापचे माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक, शेकापच्या महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील, नृपाल पाटील यांनी तातडीने जेसीबी, पोकलेन आणि डंपरची विनामूल्य सोय केली. सुरुवातीला काही राजकीय पुढारी पुढे आले; पण कामाचा उरक पाहता त्यांनी त्यातून माघार घेतली. पण प्रशांत नाईक, चित्रलेखा पाटील आणि नृपाल पाटील यांनी शेवटपर्यंत माघार घेतली नाही. प्रशासनाने दिलेल्या तारखेपर्यंत गाळ काढण्याचे शिवधनुष्य त्यांनी लिलया पेलले. त्यामुळे यंदाच्या पावसाच्या हंगामामध्ये लाखो लीटर पाण्याचा अधिकचा साठा धरणामध्ये झाला. त्यामुळे नागरिकांनी धन्यवाद दिले होते. हाच प्रवास घरत दाम्पत्याने आपल्या सजावटीमध्ये साकारला आहे.

# जलवाहिन्या बदलण्याचे काम निकृष्ट दर्जाचे

## जागोजागी वारंवार फुटून पाण्याची नासाडी

। श्रीवर्धन । वार्ताहर ।

मागील दोन वर्षांपासून श्रीवर्धन नगर परिषदेने जलशुद्धीकरण प्रकल्प व शहरातील जलवाहिन्या बदलण्याचे काम हाती घेतले होते. सदरचे काम एका ठेकेदाराला देण्यात आले होते. दोन वर्षे ठेकेदाराकडून श्रीवर्धन शहरामध्ये ठिकठिकाणी खोदकाम सुरू होते. त्यामुळे प्रचंड धुरळा सर्वत्र उडत होता. धुरळ्यामुळे नागरिकांना विविध प्रकारचे आजारदेखील होत होते. परंतु, शहराला शुद्ध पाणी पिण्याचे मिळणार, या हेतूने कोणीही तक्रार केली नाही.

मात्र, जलवाहिन्या बदलून झाल्यानंतर टाकण्यात आलेल्या जलवाहिन्या या निकृष्ट दर्जाच्या असल्याचे निष्पन्न होत आहे. कारण, जलवाहिन्या नवीन टाकल्यापासून जागोजागी जलवाहिन्या फुटून लाखो लीटर पाणी वाया जाण्याचा प्रकार घडत आहे. मे महिन्याच्या अखेरीपर्यंत संबंधित ठेकेदाराची माणसे श्रीवर्धन शहरामध्ये वास्तव्यास होती. त्यामुळे कोठेही जलवाहिनी फुटली तरी, त्या ठिकाणी रात्री जेसीबी लावून जलवाहिनी दुरुस्त करण्याचे काम केले जात होते.

मात्र, पावसाळा सुरू झाल्यानंतर ठेकेदाराची माणसे निघून गेली आहेत. आता जलवाहिनी फुटल्यानंतर दुरुस्ती कोण करणार? हा प्रश्नदेखील ऐरणीवर आला आहे. आजच सकाळी श्रीवर्धन शहरातील आंबेडकर चौकामध्ये जलवाहिनी फुटून पाणी वाया जात आहे. यावर्षी पाऊस काहीसा मुबलक प्रमाणात झाला असला तरीही अशा प्रकारे पाण्याचा अपव्यय झाला तर उन्हाळ्यामध्ये पाणीटंचाई जाणवण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी श्रीवर्धन नगर परिषदेने संबंधित ठेकेदाराकडून जलवाहिन्या का फुटतात? याबाबत विचारणा करून त्या तातडीने दुरुस्त करून घ्याव्यात, अशी मागणी शहरातील नागरिकांमधून केली जात आहे.



# तरुणीवर पाच वर्षे लैंगिक अत्याचार

। पनवेल । वार्ताहर ।

ठाण्यात राहणाऱ्या तरुणाने तरुणीला लग्नाचे आमिष दाखवून तिच्यावर मागील पाच वर्षे लैंगिक अत्याचार करुन परस्पर दुसऱ्याच तरुणीसोबत लग्न करुन पीडित तरुणीची फसवणूक केल्याचे उघडकीस आले आहे. खांदेश्वर पोलिसांनी याप्रकरणी पीडित तरुणीच्या तक्रारीवरुन आरोपी तरुणाविरोधात बलात्काराचा गुन्हा दाखल केला आहे.

### तरुणाचा शोध

या प्रकरणातील २६ वर्षीय पीडित तरुणी आणि तिच्यावर लैंगिक अत्याचार करणारा आरोपी निलेश डोके (२९) दोघेही ठाण्यात राहण्यास आहेत. निलेशने २०२० मध्ये पीडित तरुणीसोबत ओळख वाढवून तिच्यासोबत प्रेमसंबंध निर्माण केले होते. त्यानंतर त्याने लग्नाचे आमिष दाखवून सदर तरुणीला पनवेलच्या सुकापूर येथील मरीआई हॉटेलमध्ये नेऊन तिच्यावर जबरदस्तीने लैंगिक अत्याचार केले. त्यानंतरदेखील निलेश डोके याने तिला वेगवेगळ्या ठिकाणी नेऊन तिच्यावर लैंगिक अत्याचार केले. मागील पाच वर्षे आरोपी निलेशने पीडित तरुणीवर लैंगिक अत्याचार केले. त्यानंतर काही दिवसांपूर्वी त्याने दुसऱ्याच तरुणीसोबत लग्न केले. सदर बाब पीडितेला समजल्यानंतर तिने खांदेश्वर पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी निलेश डोके याच्या विरोधात बलात्काराचा गुन्हा दाखल केला आहे.

# पोलीस पाटलांची बैठक संपन्न

। पनवेल । वार्ताहर ।

आगामी गणेशोत्सव व नवरात्रौत्सवानिमित्त पनवेल शहर पोलीस ठाणे हद्दीतील पोलीस पाटील यांची बैठक घेण्यात आली.

सदर बैठक वपोनि नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आली. यावेळी उपस्थित अधिकाऱ्यांनी पोलीस पाटील यांना आगामी गणेशोत्सव व नवरात्रौत्सव शांततेत पार पाडण्याकरिता पोलिसांना आवश्यक ते सहकार्य करावे, गावातील शाळांचे मुख्याध्यापक यांची माहिती घेऊन कळवावे, गावातील महत्त्वाच्या घडामोडींबाबत तात्काळ पोलीस ठाण्यास कळवावे व नवी मुंबई पोलीस आयुक्तालयांतर्गत सुरू करण्यात आलेल्या व्हॉट्सॲप चॅनलची माहिती जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचविण्याची व सदरचा चॅनल फॉलो करण्याकरिता प्रयत्न करावे, अशा सूचना दिल्या.

# शालेय विद्यार्थ्यांना शालोपयोगी वस्तूंचे वाटप

। पनवेल । वार्ताहर ।

पनवेल तालुक्यातील वाजे येथील शाळेत युवासेनेतर्फे गरजू विद्यार्थ्यांना शालेय बॅगचे वाटप युवासेना तालुका अधिकारी मनोज कुंभारकर, तालुका चिटणीस अजय पाटील, उपतालुका अधिकारी सुरज गायकर यांच्या सौजन्याने करण्यात आले.

या कार्यकामासाठी प्रमुख उपस्थित म्हणून युवासेना रायगड जिल्हा अधिकारी पराग मोहिते, नेरे विभाग चिटणीस मनोज फडके, कॉलेज कक्षाचे मनिष पवार, शाखा अधिकारी गणेश घरत व शाळेतील प्राचार्य आणि शिक्षक उपस्थित होते.

# नीतीश व्हायचेय मला

शरद पवारांनी परवा एका वाक्यात वर्णन केले. अजून कशाचा काही पत्ता नाही नाही, त्यामुळे मुख्यमंत्री कोण ही चर्चा फिजूल आहे. भट वगैरेंना आणून नवा वाद नको म्हणून बाजारात तुरी ही म्हण बहुदा त्यांनी वापरली नसावी. ते काहीही असो. अजून निवडणुकांची घोषणा झालेली नाही. पण मुख्यमंत्रिपदाची चर्चा मात्र जोरात आहे. दीड-दोन कोटी लाडक्या बहिणींच्या आधारे निवडणूक मारून नेऊ असे महायुतीवाल्यांना वाटत होते. पण बदलापूरचा अत्याचार आणि मालवण पुतळा दुर्घटना यामुळे फुगा फुटला. त्यातच जागावाटपाच्या दिशेने गाडी जाऊ लागताच शिंदे गट व अजितदादांची राष्ट्रवादी यांच्यातला बखेडा वाढला. लाडकी बहीणच्या पोस्टरवरून दादांनी एकनाथ शिंदेंना कटाप केले. त्याला प्रत्युत्तर म्हणून खुद्द बारामतीत या पोस्टरवरून भाजपवाल्यांनी दादांचा फोटो काढून टाकला. मंत्रिमंडळाच्या बैठकीत यावरून वादंग झाले आणि अर्थ खात्याइतके नालायक खाते दुसरे कोणतेही नाही असे गुलाबराव पाटील यांनी जाहीर केले. यात बोलणाऱ्यांची नावे मिटकरी, तानाजी शिंदे अशी असली तरी ते थेट शिंदे व दादा यांच्यातलेच भांडण आहे. एरवी दोन बोक्यांच्या भांडणात आपण लोण्याचा गोळा मटकवू असे मनसुबे भाजपवाल्यांना करता आले असते. पण आता हे भांडण आपल्यालाच गाळात घेऊन जाईल हे त्यांना दिसू लागले आहे. खुद्द भाजपमध्येही सर्व काही आलबेल नाही. मुळात अमित शाह यांचा देवेंद्र फडणवीसांवर अजिबात भरोसा राहिलेला नाही. लोकसभा निवडणुकात मोदींचे जे तोंड फुटले त्यामुळे दिल्लीवाले नाराज आहेत. आता निवडणुकीच्या ऐन तोंडावर देवेंद्रांना बदलणे योग्य ठरणार नाही म्हणूनच त्यांची खुर्ची वाचली आहे. त्यातच शिंदे यांचे शाह व मोदींसोबत असलेले डायरेक्ट कनेक्शन देवेंद्र व भाजपवाल्यांना खटकते आहे. पण तोंड दाबून बुक्क्यांचा मार सहन करण्याची वेळ आली आहे. लोकसभेमुळे मोदींची जादू संपल्याचे उघड झाले.

### ताकही फुंकून पितायत भाजपवाले

सरकारची पाडापाडी, वाटेल त्यांना पक्षात घेणे यामुळे लोक भाजपवर चिडलेले आहेत. त्यामुळेच सध्या भाजपमधील इनकमिंग बंद आहे. अन्यथा, लोकसभेला दर दिवशी कसा कोण नवीन नेता आमच्याकडे आला याची जाहिरात विनोद तावडे दिल्लीतून करीत होते. अजितदादांना घेतल्यावरून इतके काही रामायण झाले आहे की आता भाजपवाले ताकही फुंकून पिऊ लागले आहेत. पूर्वी आपण विधानसभेच्या दोनशे जागा लढवू अशी स्वप्ने चंद्रशेखर बावनकुळे वगैरे लोक पाहत होते. पण आता एकशेसाठ तरी मिळायला हव्यात असे काकुळतीने म्हणत आहेत. मराठा आरक्षणामध्ये चीत भी मेरी आणि पट भी मेरी असे करून दाखवू असे देवेंद्रांना वाटत होते. त्यासाठी बऱ्याच काड्या त्यांनी केल्या. शिंद्यांना पुढे करून जरांगेचा वापर करून घेऊ आणि ओबीसी आपल्याला सोडून जातात कुठे असा विचार होता. पण शिंदे सवाई ठरले. आता जरांगे शिंद्यांचे गुणगान करतात आणि देवेंद्रांना मोजून शिव्या देतात. बाकी काही नाही जरांगे भाजपची मते आणि जागा कमी करणार हे नक्की. दुसरीकडे शिंदेंनी गुरुची विद्या गुरुला भेट दिली आहे. जागावाटपाच्या चर्चेत ते आता स्वतःची सर्वेक्षणे घेऊन बसतात आणि थेट दीडशे जागांवर आपला प्रभाव आहे असे म्हणतात. अजितदादांनी साठ जागा हव्यातच अशी घोषणा करून टाकली आहे. म्हणजे शिंद्यांनाही जेमतेम साठ जागा उरतात. किंवा मग भाजपला कमी जागा लढवाव्या लागतील. आतापर्यंत दादा गटातले लोक शरद पवारांकडे जात होते. भाजपकडून तिकिट मिळणार नाही म्हटल्यावर तिथूनही पवार किंवा सेनेत लोक जाऊ शकतात. कोल्हापुरात समरजित घाटगे गेलेच. इंदापुरात हर्षवर्धन पाटलांचे तळ्यात मळ्यात आहे. एकूण विधानसभेला उलटी गंगा पाहायला मिळणार आहे. शिंदेंना काही करून पंक्चर करणे फडणवीस आणि दादांसाठी आवश्यक आहे. फडणवीसांनी अमित शाह यांनाही हे सांगायचा प्रयत्न केला. पण त्यांची गणिते काही वेगळीच दिसतात.

### दादा माघारी येणार?

शिंदे यांच्या नेतृत्वाखाली निवडणुका लढणार असे फडणवीस काल म्हणाले. पण पुढचा मुख्यमंत्री कोण हे नंतर ठरेल असेही त्यांनी सांगितले. एकूण देवेंद्रांनी अजूनही आशा सोडलेली नाही. तर शिंदे यांना महाराष्ट्राचे नीतीशकुमार व्हायचे आहे. नीतीशना ४५ जागा असूनही कित्येक वर्षे तेच मुख्यमंत्री होत आहेत. शिंद्यांचा आत्मविश्वास भारी आहे. त्यांना पंक्चर केल्याखेरीज फडणवीस आणि दादांना पुढे सरकता येणार नाही. त्यातच दादा अधूनमधून परतीचे मार्ग चाचपून पाहातायत की काय ही शंका आहे. दादांचे बरेच आमदार आणि नेते काकांकडे जाऊन तिकिट मागायच्या तयारीत आहेत. पुणे जिल्ह्यातच खिंडार पडण्याची भीती आहे. मुसलमान आणि दलितांचा भाजपला विरोध आपण कशाला उसना पत्करायचा असाही सवाल आहेच. म्हणून काल गडचिरोलीत अत्राम यांच्या मुलीला दादा म्हणाले की मी घर फोडून चूक केली. तू करू नको. दादांनी पत्नीला बारामतीत तिकिट देण्याची चूक केली हेही म्हणून झालेले आहेच. दुसरीकडे दादांना परत घ्यायचे की नाही हे पक्ष ठरवेल असे काकाही एकदा म्हणालेले आहेत. त्यामुळे आता किंवा निवडणुकीनंतर हातमिळवणी अशक्य नाही. महाविकास आघाडीत जाऊन दादा हेच महाराष्ट्राचे नीतीश होऊ शकतील अशी स्वप्नेही त्यांचे कार्यकर्ते पाहत आहेत. दुसरीकडे महाविकास आघाडीला वातावरण अनुकूल आहे. पण म्हणजे ते प्रचंड मतांनी जिंकतील असे कोणी मानत नाही. त्या स्थितीत उद्धव यांनाही आघाडीतले नीतीश व्हायला आवडेल. त्यांनी तर आताच धोशा लावला होता की चेहरा जाहीर करा. काकांनी त्याला ब्रेक लावलाय. काँग्रेसवाले सध्या हवेत उडत आहेत. आपल्या शंभर जागा आल्याच असे गृहित धरून चालले आहेत. पण शरद पवारांना जमिनीवरची वस्तुस्थिती ठाऊक आहे. यावेळी ढीगभर बंडखोर, मराठा आणि दुसरे आरक्षणवाले उमेदवार असणार आहेत. त्यात अंतिम निकाल काहीही लागू शकतो. नीतीश व्हायचेय मला या नाटकाचे प्रयोग बराच काळ चालणार आहेत.

विचार

# उद्योगांची जोमदार लगबग

***देशातील अनेक मोठ्या उद्योगांनी अलिकडे महत्वाच्या बातम्या दिल्या. अदानी समूहाने धारावीमध्ये दोन हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करणार असल्याचे जाहीर केले. याच सुमारास 'ॲपल' भारतात महिलांना दीड लाख रोजगार देणार असल्याची बातमी आली. दरम्यान, 'रिलायन्स जिओ' जगातील सर्वात मोठी डेटा कंपनी बनली तर 'पिकॅडेली ॲग्रो' या मद्य कंपनीने शेअरधारकांना मालामाल केल्याची माहितीही समोर आली.***




महेश देशपांडे

सरता आठवडा विविध उद्योगसमूहांमधील जोमदार घडामोडींसाठी लक्षात राहील. देशातील अनेक मोठ्या उद्योगांनी या काळात महत्वाची कामगिरी बजावली. सर्वप्रथम अदानी समूहाने धारावीमध्ये दोन हजार कोटींची गुंतवणूक करणार असल्याचे जाहीर केले. याच सुमारास 'ॲपल' भारतात दीड लाख महिलांना रोजगार देणार असल्याची बातमी पुढे आली. दरम्यान, 'रिलायन्स जिओ' जगातील सर्वात मोठी डेटा कंपनी बनली असून पिकॅडेली ॲग्रो या मद्य कंपनीने शेअरधारकांना मालामाल केल्याची रंजक माहितीही समोर आली.

अदानी समूहाने धारावी पुनर्विकास प्रकल्प (डीआरपी) मध्ये दोन हजार कोटी रुपयांची गुंतवणूक केली आहे. मुंबईतील ६४० एकरांवर पसरलेल्या आशियातील सर्वात मोठ्या झोपडपट्टीच्या पुनर्विकासासाठी अदानी समूह आणि महाराष्ट्र सरकार एकत्र काम करत आहेत. एका अहवालानुसार, या संयुक्त उपक्रमाचे नेतृत्व अदानी समूह करत आहे. हा समूह धारावीमध्ये निवासी आणि व्यावसायिक युनिट्स बांधणार आहे. धारावी पुनर्विकास प्रकल्पाचे सीईओ एसव्हीआर श्रीनिवास सांगतात की हा माझ्या कारकीर्दीतील हा सर्वात आव्हानात्मक प्रकल्प आहे. आव्हाने असूनही, पुढील दोन ते अडीच वर्षांमध्ये पात्र कुटुंबांचे पुनर्वसन करण्याचे या प्रकल्पाचे उद्दिष्ट आहे. या प्रकल्पासाठी दिलेल्या २७ एकर जमिनीसाठी अदानी समूहाने भारतीय रेल्वेला यापूर्वीच एक हजार कोटी रुपये दिले आहेत.

धारावीमधील सदनिकांच्या मोजणी आणि तपशीलवार सर्वेक्षणासाठी अतिरिक्त निधी वापरला जात आहे. पुढील एक-दोन महिन्यांमध्ये येथे बांधकाम सुरू होण्याची शक्यता आहे. पुढील चार ते सहा महिन्यांमध्ये रेल्वेच्या जमिनीवर पुनर्वसन इमारतींचे बांधकाम सुरू करण्याचे या प्रकल्पाचे उद्दिष्ट आहे. १५ ते वीस हजार घरे बांधण्याची योजना आहे. या प्रकल्पात शंभरहून अधिक कर्मचारी विविध भूमिकांमध्ये कार्यरत आहेत. या प्रकल्पासमोर अनेक आव्हाने आहेत. यात लोकसंख्येची उच्च घनता, विमानउड्डाण ऑपरेशन्समुळे निर्बंध, कोस्टल रेग्युलेशन झोनचे नियम, निवासी आणि व्यावसायिक मालमत्तांचे एकत्रीकरण आणि मिठी नदीचे सान्निध्य यांचा समावेश आहे. अनेक सरकारी संस्थांनी जमीन देण्यास नकार दिल्यान येथे प्रकल्पासाठी अतिरिक्त जमीन संपादन करणेही अवघड झाले आहे. धारावीमध्ये ३५० चौरस फुटाची मोफत घरे उपलब्ध होणार आहे. ज्यांनी एक जानेवारी २००० किंवा त्यापूर्वी भाड्याच्या निवासस्थानावर कब्जा केला होता आणि सध्या तळमजल्यावर राहतात, त्यांना धारावीमध्ये ३५० चौरस फुटांचे विनामूल्य अपार्टमेंट मिळेल. १ जानेवारी २००० ते १ जानेवारी २०११ दरम्यान येथे राहणाऱ्या रहिवाशांना प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत मुंबईत २.५ लाख रुपये भरून घरांचे वाटप केले जाईल. रहिवासी १ जानेवारी, २०११ नंतर आले असतील आणि तळमजल्यावर राहत असतील, तर त्यांना अपात्र मानले जाईल; परंतु नंतर भाड्याने निवास प्रदान केले जाईल.

दरम्यान, 'आयफोन' बनवणारी ॲपल पुढील वर्षी मार्चपर्यंत भारतात दोन लाख थेट नोकऱ्या देणार आहे. यातील ७० टक्के नोकऱ्या महिलांसाठी असतील. 'ॲपल' आणि त्यांच्या भारतातील पुरवठादारांनी ही आकडेवारी केंद्र सरकारला दिली आहे. 'ॲपल'ला उत्पादनाच्या बाबतीत चीनवरील अवलंबित्व कमी करून भारतावर लक्ष केंद्रित करायचे आहे. 'ॲपल'चे कंत्राटी उत्पादक फॉक्सकॉन, विस्ट्रॉन (आता टाटा इलेक्ट्रॉनिक्स) आणि पेगॉट्रॉन यांनी भारतात ८०,८७२ लोकांना थेट नोकऱ्या दिल्या आहेत. याव्यतिरिक्त टाटा ग्रुप, सालकॉम्प, मदरसन, फॉक्सलिंक (तामिळनाडू), सुनवोडा (उत्तर प्रदेश), एटीएल (हरियाणा) आणि जबिल (महाराष्ट्र) या पुरवठादारांनी मिळून सुमारे ८४ हजार थेट नोकऱ्या निर्माण केल्या आहेत. २०२० पासून विक्रेते आणि पुरवठादारांनी १.६५ लाख नोकऱ्या दिल्या आहेत. २०२० मध्ये स्मार्टफोन पीएलआय (प्रॉडक्शन लिंक्ड इनिशिएटिव्ह स्कीम)पासून 'ॲपल'च्या विक्रेते-पुरवठादारांनी भारतात १.६५ लाख थेट नोकऱ्या निर्माण केल्या आहेत. 'ॲपल' भारतात सतत उत्पादन क्षमता वाढवत आहे. सरकारचा अंदाज आहे की इलेक्ट्रॉनिक्स उद्योगात प्रत्येक थेट नोकरीसाठी तीन अतिरिक्त नोकऱ्या निर्माण होतात. याचा अर्थ 'ॲपल' इकोसिस्टीममध्ये मार्चअखेर पाच ते सहा लाख नोकऱ्या निर्माण होऊ शकतात. २०१७ पासून भारतात 'आयफोन' बनवले जात आहेत. 'ॲपल'ने २०१७ मध्ये 'आयफोन एसई' या मॉडेलची निर्मिती भारतात सुरु केली. आयफोन एसई नंतर आयफोन ११, आयफोन १२ आणि आयफोन १३ देखील भारतात तयार करण्यात आले. फॉक्सकॉनचा प्लांट चेन्नईजवळील श्रीपेरंबदुर येथे आहे. याच सुमारास 'रिलायन्स जिओ' जगातील सर्वात मोठी मोबाइल डेटा कंपनी बनली. जगातील एकूण मोबाइल डेटा ट्रॅफिकपैकी आठ टक्के तिच्या नेटवर्कवर होत आहे. हा आकडा विकसित बाजारपेठांसह सर्व प्रमुख जागतिक ऑपरेटरपेक्षा जास्त आहे. कंपनीचा ग्राहकवर्ग आणि डेटा वापर सातत्याने वाढत आहे. रिलायन्सने १.७ लाख नवीन नोकऱ्या दिल्यानंतर एकूण कर्मचाऱ्यांची संख्या ६.५ लाखांवर पोहोचली. 'रिलायन्स जिओ' लाँच होऊन फक्त आठ वर्षे झाली. या काळात जगातील सर्वात मोठी मोबाईल डेटा कंपनी बनण्याचा पराक्रम रिलायन्सने केला आहे. डिजिटल होम सेवेच्या बाबतीत, जिओ ही जगातील सर्वात मोठ्या कंपन्यांमध्ये आहे. 'जिओ' तीन कोटींहून अधिक घरांना डिजिटल सेवा पुरवते. दर ३० दिवसांमध्ये दहा लाख घरांपर्यंत पोहोचण्याचे 'जिओ फायबर'चे उद्दिष्ट आहे. जिओ वापरकर्त्यांना लवकरच १०० जीबी स्टोरेज मोफत मिळणार आहे. जिओ एआय क्लाऊड येत्या दिवाळीच्या सुमारास लाँच होणार असून वापरकर्त्यांना १०० जीबी स्टोरेज मोफत मिळणार आहे.

आता एक रंजक बातमी. 'इंद्री' ही जगातील सर्वोत्तम व्हिस्की तयार करणाऱ्या पिकॅडेली ॲग्रो कंपनीच्या शेअरमध्ये तुफान तेजीचे सत्र आहे. पिकॅडेली ॲग्रोचा शेअर मल्टिबॅगर ठरला आहे. या शेअरमध्ये शुक्रवारी पाच टक्क्यांची तेजी दिसून आली. मुंबई स्टॉक एक्सचेंजवर हा शेअर ८००.९५ रुपयांवर पोहोचला. त्यामुळे मद्यप्रेमींसोबतच गुंतवणूकदार मालामाल झाले. ही कंपनी लवकरच दोन नवीन व्हिस्की ब्रँड्स बाजारात आणणार आहे. कंपनीच्या दोन मेन व्हिस्की ब्रँड्सना सेंट्रल ऑर्म्ड पुलिस फोर्सेज कँटिनमध्ये पुरवठा करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. पिकॅडिली ॲग्रोच्या शेअरमध्ये गेल्या पाच वर्षांमध्ये दहा हजार टक्क्यांपेक्षा अधिक उसळी आली. या कंपनीच्या शेअरचा ५२ आठवड्यातील उच्चांक ९१०.७० रुपये आहे तर पिकॅडिली ॲग्रोच्या शेअरचा ५२ आठवड्यातील निचांक ९५ रुपये आहे. एकाच वर्षात कंपनीने गुंतवणूकदारांना ५९३.१० टक्क्यांपेक्षा अधिकची कमाई करून दिली आहे. दारु तयार करणाऱ्या पिकॅडिली ॲग्रोमध्ये ९५ रुपये प्रति शेअर या दराने एक लाख रुपयांचे शेअर खरेदी करणाऱ्यांना ५९३ टक्क्यांचा फायदा झाला. त्यांच्या एक लाख रुपयांचे आता आठ लाख ४२ हजार ४०० रुपये झाले आहेत. एक वर्षापूर्वी कंपनीचा शेअर ९५ रुपये होता. आता हा शेअर ८०० रुपयांवर पोहचला आहे. याशिवाय कंपनीत सहा महिन्यांपूर्वी गुंतवणूक करणाऱ्यांना दुप्पट फायदा झाला आहे. गेल्या सहा महिन्यांमध्ये पिकॅडिली ॲग्रोच्या शेअरमध्ये ११५ टक्क्यांहून अधिकचा फायदा झाला आहे. पिकॅडिली ॲग्रोचा शेअर गेल्या ५ वर्षांमध्ये १०४०० टक्क्यांहून अधिक उसळला आहे. या कंपनीचा शेअर ३० ऑगस्ट २०१९ रोजी ७.३४ रुपयांवर होता. हा शेअर २९ ऑगस्ट २०२४ रोजी मुंबई स्टॉक एक्सचेंजवर ७८८.४५ रुपयांवर पोहचला. गेल्या चार वर्षांमध्ये कंपनीच्या शेअरमध्ये ८३०० टक्क्यांहून अधिकची तेजी आली.

आजकाल

# मिच्छामी दुक्कडम् - सर्वांनी अंगिकारावे असे व्रत

अजित देशपांडे

भारतीय परंपरेतुन उगम पावलेल्या विविध पंथ, धर्मांमध्ये जैन तत्वज्ञान आणि जैन दर्शन महत्वाचे मानले गेले आहे. जैनांना वेदप्रामाण्य मान्य नसल्याने यास '**नास्तिक दर्शन**' असे ही म्हंटले जाते.

जैन समाज हा भारतीय समाजात इतका एकरुप झालेला आहे की दैनंदिन व्यवहारात त्याचे धार्मिक वेगळेपण दिसून येत नाही.

धार्मिक बाबतीतील अनेक जैन परंपरा इतर धर्मियांना ज्ञात नसतात. त्यामुळे त्याचे महत्व लक्षात येत नाही.

जैन परंपरेमध्ये श्वेतांबर आणि दिगंबर असे दोन पंथ आहेत. या दोन्ही पंथात मुलभूत फरक हा वस्त्रपरीधाना बाबत आहेत. उपासना पध्दतीत, तत्वज्ञानात त्यांच्यात विशेष फरक दिसून येत नाही.

जैन परंपरेत चातुर्मासास विशेष महत्व असते. या कालावधीमध्ये जैनांची अनेक पर्व येतात.

'मिच्छामी दुक्कडम' त्या पैकी एक क्षमायाचनेचे पर्व आहे. संवत्सरी अंतर्गत येणारे क्षमायाचना पर्व महत्वाचे आणि सर्व धार्मियांनी पाळावे असेच आहे.

श्वेतांबर परंपरेतील संवत्सरी आणि दिगंबर परंपरेतील क्षमावाणी या विधीसाठी मोठ्या प्रमाणावर वापरले जाते.

जैन परंपेराच्या उगमाच्या वेळी भारतातील सर्वसामान्य जनता ही प्राकृत भाषेचा वापर करत होती. त्या मुळे जैनांचे जवळपास सर्वच ग्रंथ हे प्राकृत भाषेत आहेत. पुढे मात्र प्राकृत भाषेच्या प्रांताप्रातातील वैविध्यतेमुळे सर्व ठिकाणी एकच भाषा असावी या हेतूने ग्रंथरचना संस्कृत मध्ये केली गेली.

'मिच्छामी दुक्कडम' ज्याला मिच्छ मी दुक्कडम् असेही लिहिलेले आहे, हे प्राचीन भारतीय प्राकृत भाषेतील वाक्य आहे, जे जैन ग्रंथांमध्ये आढळते.

त्याचे संस्कृत मधील रुपांतर आहे ''मिथ्य मे दुस्कृतम'

याचा शब्दशः अर्थ ''मी केलेली सर्व दुष्कृत्ये नष्ट होवोत. असा आहे. पण जैन परंपरेत याचा अर्थ क्षमा याचना असा आहे.''

आपण ज्या परिसरात रहातो, व्यवहार करतो त्या मध्ये मानवा शिवाय अनेक प्रकारचे जीवजंतू सुध्दा वास करीत असातात. आपले सर्वां सोबत सहजीवन असते. आपल्या प्रत्येक कृतीतून या जीवजंतू वर कळत नकळत चांगला वाईट परिणाम होत असतो. आपल्या कृतीमुळे आपण त्यांचे अपराधी असतो. ज्यास अपराध मानावे अश्या कित्येक गोष्टी आपल्या नकळत आपल्या हातून घडत असतात.

जैन परंपरे मध्ये एकुण सजीवांचे ५६३ प्रकार सांगितले आहेत. या सजीवांसोबत आपणांकडून १० प्रकारचे अहितकराक व्यवहार अपराध ज्या हिंसा असे सोंबधले जाते . यात - अभिया, वट्टिया, लेसिया, संघैया, संघटिया, परियाविया, किलमिया, उद्दविया, थानाओ थानम, संकमिया. यांचा समावेश होतो.

तसेच आपण शरीराने, वाचा (शब्दाने), मनाने, बुध्दीने, राग, द्वेषाने कळत नकळत वर्तमान भूत काळात सोबत भविष्यातही तसेच करण, करावण, अनुमोदना या तीन प्रकाराने आपणा कडून वेगवेगळया कारणांमुळे या ५६३ जीवांची हिंसा - अपराध करीत असतो.

या सर्वांनी मिळून एकुण १,०१,३४० पेक्षा जास्त प्रकाराचे अपराध जैन सुत्रग्रंथात सांगितले आहेत. या सर्वांसाठीची क्षमा मागण्यांसाठी या पर्वाद्वारे परिमार्जन केले जाते.

या सुत्रात एक प्रार्थना आहे त्यांचा अर्थ असा होतो की, ''मी सर्व प्राणिमात्रांची क्षमा मागतो, ते सर्व मला क्षमा करतील, माझी सर्व प्राण्यांशी मैत्री असावी आणि कोणाशीही शत्रुत्व असू नये.''

धार्मिक विधी म्हणून, जैन त्यांच्या मित्रांना आणि नातेवाईकांना या दिवशी ''मिच्छामी दुक्कडम्'' अभिवादन करतात आणि त्यांची मनापासून क्षमा मागतात. अनेक जैन मित्र आपल्या अन्य धर्मिय मित्रांना सुध्दा मेजेस फोनद्वारे क्षमा मागतात. पण त्याचा अर्थ माहित नसल्याने त्यास प्रतिउत्तर देता येत नाही. त्या साठी याचा खरा अर्थ समजून आपणही त्यांची क्षमा मागणे योग्य असते.

हे पर्व चातुर्मासात (पावसाळी महिने) दरम्यान संध्याकाळी आयोजित केले जाते.

सामान्यतः एखाद्याच्या गुरूसमोर किंवा तीर्थंकराच्या प्रतिमेसमोर. श्वेतांबर परंपरेतील संवत्सरी आणि दिगंबरा परंपरेतील क्षमावाणी हा सामुदायिक सोहळा म्हणून तो विशेषतः लोकप्रिय आहे.

प्रतिक्रमणानंतर - आपल्या चुकांबद्दल कबुली देणे आणि सामान्य लोकांसाठी जैन जीवन संहितेचे उल्लंघन केल्याबद्दल पश्चात्ताप, एक जैन जगातील सर्व जीवन प्रकारांची क्षमा मागतो ज्यांना त्यांनी जाणूनबुजून किंवा अजाणतेपणाने हानी पोहोचवली असेल मिच्छामि दुक्काडाम. पर्युषण पर्व साधारण पणे इंग्रजी ऑगस्ट किंवा सप्टेंबर महिन्यामध्ये येते.

कळत नकळत केलेल्या अपराधांसाठी क्षमा याचना केल्याने अहंकार कमी होवुन आंगी नम्रता येते. आपण जैन परंपरेतील या प्रथेचा बोध घेवुन आपल्या प्रिय जणांची वर्षातुन एकदा क्षमायाचना करावयास हवी. क्षमा मागितली म्हणून कोणी छोटा होत नाही तर विनम्रता हाच आपला गुण असावयास हवा.

सर्वांना ''मिच्छामी दुक्कडम्'' यावर्षी १ सप्टेंबर ते ८ सप्टेंबर २०२४ या कालावधीमध्ये हे पर्व साजरे केले जात आहे.

**(साभार)**

लोकसंसद

## चाकरमान्यांच्या समस्याकडे शासन लक्ष देईल काय?

मुंबई-गोवा मार्गाचे काम गेल्या १३ वर्षापासून राखडले आहे. अजूनही रस्त्याचे काम मार्गी लागत नाही. पावसामुळे महामार्गची अवस्था बिकट झाली आहे. खड्डे पडले आहेत. ते भरण्याचे काम सुद्धा सुरु झालेले प्रवास करताना दिसलें, असे असले तरी काही ठिकाणी रस्त्याचे काम पूर्ण न झाल्यामुळे वाहने विरुद्ध दिशेने येणाऱ्या वाहनच्या मार्गावरून वळवावी लागत आहेत. त्याचे पुरेसे फलक आणि व्यवस्था नसल्यामुळे चाकरमान्याना ट्राफिक च्या समस्सेला तोंड द्यावे लागत आहे. दरवर्षी कोकण वासियांचे प्रवास करताना हाल होतात. प्रवाशांना एकठिकाणी २ ते ३ तास रहदारीमुळे लागत असेल तर चालेल्या कामावर प्रश्न चिन्ह निर्माण होतो. गावाकडे जाताना चाकरमानी गणपती साठी डेकोरेशन, आवश्यक साहित्य बसने स्वतःच्या गाडीने नेत असतो. कोकणवासिय ठरवलेल्या वेळेत घरी पोचला असे होत नाही. शासनाने जादा ट्रेन सोडल्या असल्यातरी त्या कोकण वासियांसाठी पुरेस्या नाहीत. कोकण वासियांची या समस्सेतून सुटका कधी होणार हे शासनाने कोकण वासियांना सांगावे.

- **सुनील शिंदे,** पनवेल

मराठी साहित्यिक दिनविशेष

**९ सप्टेंबर**

**१९१२ :** लेखक, शिक्षणतज्ज्ञ डॉ. श्रीधर रामकृष्ण आचार्य यांचा जन्म. ह्यांच्या साहित्य संपदेत 'आधुनिक भारतातील शैक्षणिक प्रबोधन' मधून भारतातील २१ विचारवंतांच्या कार्याचा आढावा मूल्यमापन केले आहे. **१९१८ :** मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृतीचे अभ्यासक मुरलीधर गजानन पानसे यांचा जन्म. 'ज्ञानेश्वरीच्या भाषावैशिष्ट्यांवरील प्रबंध', 'यादवकालीन महाराष्ट्र' हे पुस्तक, तसेच 'भाषा : अंतसूत्रे आणि व्यवहार' आणि 'श्रीपतीभट्टाची ज्योतिषरत्नमाला' व त्यावरील मराठी टीकांचे संपादन'ही त्यांची कामगिरी. पानसे यांनी इंग्रजीतूनही लेखन केले आहे. व्यासंग, ऐतिहासिक दृष्टी आणि मांडणीचा नेटकेपणा हे त्यांच्या लेखनाचे वैशिष्ट्य. **१९१९ :** लेखक, मराठी तत्वज्ञान महाकोशाचे संपादक मंडळावरील सदस्य प्रा.डॉ. अनंत गणेश जावडेकर यांचा जन्म. यांचा 'समर्थ रामदास जीवन व तत्वज्ञान' व 'ज्ञान प्रामाण्याचे मूल्यात्मक आलोचन' या ग्रंथातून ज्ञानाच्या प्रामाण्याविषयी निरनिराळ्या दर्शनांचे मतांचे मूल्यात्मक दृष्टीने समन्वय व त्यांचे श्रेणीबद्ध तारतम्य याशिवाय शंभराहून अधिक संशोधनपर लेख त्यांचे प्रकाशित झाले आहेत. **१९२१ :** लेखिका, बालसाहित्यिक प्राचार्य विद्या प्रभाकर शिधये यांचा जन्म. 'सुखी संसार' हा पती-पत्नीवर बेतलेल्या ग्रंथासह'आस्वाद' हा काव्यसंग्रह आणि'जादूचा दिवा व इतर गोष्टी'हे बालसाहित्य प्रसिद्ध. **१९२९ :** मराठी, इंग्रजीसह संस्कृत, अर्धमागधीमधून संशोधनात्मक लेखन करणारे डॉ. केशव वामन आपटे यांचा जन्म. ह्यांच्या लेखन संपदेत कालिदासकृत 'विक्रमार्वशीय' हे अनुवादित नाटक. 'श्रीगुरूतृतीय कथा', 'श्रीनिंबरगीकर महाराज आणि श्रीरघुनाथप्रिय साधुमहाराज यांचे चरित्र' याशिवाय 'ब्रह्मसूत्र शांकरभाष्य चतुःसूत्री','हेमचंद्रकृत अपभ्रंश व्याकरण' अशी साहित्य संपदा. **१९३४ :** लेखक, चरित्रकार, सुधारणावादी विचारवंत दिनकर सखाराम वर्दे यांचे निधन. 'मासिक मनोरंजन' मधील 'आगरकर' ह्या विशेषांकात त्यांनी लिहिलेला'सामाजिक सुधारणा व आगरकर' हा त्यांचे उल्लेखनीय लेख. तसेच त्यांनी देशातील थोर स्त्रियांची महती गाणारी चरित्रे'ऐतिहासिक स्त्रिया भाग १' या नावाने लिहिली. **१९३५ :** लेखक डॉ. शरद अभ्यंकर यांचा जन्म. 'जरा शहाणे होऊ' या स्वतंत्र लेखसंग्रहासह 'परमेश्वरावर मात आणि बुवाबाजी हटाव' ही भाषांतरीत पुस्तके त्यांच्या नावावर आहेत. १९३९ : विविध नियतकालिकांतून लेख, कथा आणि इतर स्वरूपाचे लेखन करणारे लेखक डॉ. मल्हार गंगाधर कावळे यांचा जन्म. 'रंग माझा वेगळा', 'शापदग्ध' हे कथासंग्रह प्रसिद्ध तसेच स्वलिखित कथांचे ते कार्यक्रम सादर करतात. १९३९ : वेदांतविषयक ग्रंथाचे कर्ते रामराव कृष्णराव जठार यांचे निधन. भारतीय तत्वज्ञानाच्या व्यासंगाधारे त्यांनी 'अव्यक्त बोध व स्वानंदासाम्राज्य' असे दोन वेदांतग्रंथ लिहिले. काही पाश्चात्य विद्वानांच्या मतांचा परामर्ष घेऊन हे ग्रंथ त्यांनी साकारलेत.'अव्यक्तबोध' या ग्रंथातून'पुरूष','प्रकृती','नाम', 'रूप', 'कारण', 'श्रृती आणि उपसंहार' या विषयांवर तर 'स्वानंदसाम्राज्य' या ग्रंथातून ब्रह्म, माया, ईश्वर, सृष्टी आणि जीव आदींवर चर्चा. समाजाला धर्मोन्नतीच्या व आत्मोन्नतीच्या मार्गाकडे जाण्याच्या हेतूने या ग्रंथाची त्यांनी निर्मिती केली. **१९७८ :** मराठीत ग्रंथालयशास्त्रासारख्या किचकट विषयावर व्यासंगपूर्ण लेखन करणारे वासुदेव पुरूषोत्तम कोल्हटकर यांचे निधन. 'ग्रंथालयाची व्यवस्था', 'ग्रंथ वर्गीकरणाची कोलन पद्धत' तसेच 'ग्रंथपालाचे आप्त' ही त्यांची पुस्तके. १९८० : चरित्रकार व गांधीवादविषयक पुस्तके लिहिणारे दा.न. शिखरे यांचे निधन. 'मराठीचे पंचप्राण' या १९५० पर्यंतच्या साहित्याचा परिचय त्यांनी करून दिला होता. गांधीचरित्राखेरीज आगरकर, बजाज, नेहरू यांची चरित्रपुस्तके त्यांनी लिहिली. याखेरीज'जातीय ऐक्य' व 'अर्थकारण' हा संपादित अनुवादीत ग्रंथ. डॉन किवकझोट हा अनुवाद तसेच काही बालसाहित्य आणि 'हीच माझी कमाई' या आत्मचरित्रासह १५० पुस्तके त्यांच्या नावावर आहेत. **१९९१ :** 'बगळ्यांची माळ फुले'..'आज राणी पूर्वीची ती प्रीत मागू नको....''त्या तरूतळी विसरले गीत' अशा गीतकाव्यांसह 'वेलांटी', 'दोनुली', 'रूद्रवीणा' आदी सात काव्यसंग्रह आणि'मरणगंध' हे नाट्यकाव्य लिहिणारे कविवर्य वामन रामराव कांत यांचे निधन.

- संजय वझरेकर
९९७५५७६६७५

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

९ सप्टेंबर

१) श्रीम. सुमती गणेश आठवले
अलिबाग, ९-९-१९४२

२) श्रीम. स्मिता दिलीप प्रधान
पिंपळभाट, ९-९-१९५८

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

### आजचे अन्नदाते

**स्व. परेश नवीनचंद्र गाला**
०८-०९-२०२४
**स्मरणार्थ, सांताक्रूझ**



**कै. विठ्ठल रामदास पाटील**
०८-०९-२०२४
**स्मरणार्थ अलिबाग**

# 'एकदेशी व्यवस्थेमुळेच विकास खुंटला'

**। माथेरान । वार्ताहर ।**

अतिदुर्गम भागात वसलेल्या माथेरान सारख्या टुमदार पर्यटनस्थळाला निसर्गाने भरभरून ओतप्रोत सुंदरता दिलेली असून नैसर्गिक वरदहस्त लाभलेला आहे. राज्यातील एकमेव प्रदूषणमुक्त स्थळ असल्यामुळेच इथे बाराही महिने पर्यटकांची रेलचेल मोठ्या प्रमाणात वाढली आहे. तरीसुद्धा येण्या-जाण्यासाठी नेरळ मार्गे माथेरान हा एकमेव वाहतुकीसाठी आणि दळणवळण सुविधेकरिता मार्ग उपलब्ध असल्याने या पर्यटनस्थळाच्या विकासाची कवाडे अद्यापही बंद आहेत.

## ■ माथेरानला पर्यायी मार्गाची गरज



ब्रिटिश कालखंडात १८५० साली या ठिकाणाचा शोध लागला असून येथे येण्यासाठी पर्यायी मार्गाने व्यवस्था उपलब्ध असताना देखील केवळ शासनाच्या दिरंगाईमुळे आणि राजकारणापायी आजमितीपर्यंत पर्यटन वाढीसाठी पर्यायी मार्ग बनविण्यात आलेला नाही. यामुळेच पिढ्यानपिढ्या वास्तव्यास असणाऱ्या भूमिपुत्रांना नाईलाजाने नेरळ मार्गे माथेरान मार्गावर अवलंबून राहावे लागत आहे. तसेच, अत्यावश्यक सेवासुविधा याच मार्गी असून यामध्ये वीज यंत्रणा असो किंवा पाणी योजना असो, जीवनावश्यक साहित्याची आवक देखील याच मार्गाने केली जात आहे. यामुळे वाढीव दराने वस्तू खरेदी कराव्या लागत आहेत.

या एकमेव घाटरस्त्यात अनेकदा पावसाळ्यात दरडी कोसळल्यामुळे वाहतूक ठप्प होऊन जाते. याचे उदाहरण म्हणजे २००५ मध्ये अतिवृष्टीमुळे मिनीट्रेन सेवा तब्बल दोन वर्षे बंद करण्यात आली होती. तर, मोटार रस्ता सुध्दा काहीकाळ बंद करण्यात आला होता. याकाळात माथेरानचा बाहेरच्या शहरांशी संपूर्ण जनसंपर्क तुटल्याने स्थानिकांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागले होते. एखाद्याची अंतयात्रा देखील घाटरस्त्यात दोरीच्या सहाय्याने वर चढत केली जात होती. इतकी भयानक परिस्थिती त्यावेळी स्थानिकांनी अनुभवली आहे. अशीच परिस्थिती पुन्हा कधी निर्माण होऊ नये यासाठी पर्यायी व्यवस्था उपलब्ध होणे काळाची गरज बनली आहे.

मागील काळात पनवेल-धोदाणी मार्गे सनसेट पॉईंटपर्यंत फिनिक्युलर रेल सेवेचा महत्वाकांक्षी प्रकल्प जवळजवळ मार्गी लागणार होता. परंतु, तालुक्यातील लोकप्रतिनिधींनी केवळ नेरळ भागातील मतांसाठी या प्रकल्पाला विरोध दर्शविला होता. यामुळे आजपर्यंत याठिकाणी पर्यायी व्यवस्था निर्माण केली जात नाही आणि भविष्यात सुद्धा हीच परिस्थिती असणार आहे. यासाठी दस्तुरखुद्द मुख्यमंत्र्यांनी या स्थळाकडे लक्ष केंद्रित करून येथील पर्यटन कशाप्रकारे वाढू शकते. याकामी पर्यायी व्यवस्था उपलब्ध करुन दिल्यास हा संपूर्ण दुर्गम भाग सुशोभित होऊन पर्यटन क्रांती घडू शकते. तसेच, शासनाने सद्यस्थितीत फिनिक्युलर अथवा रोपवे या पर्यायी सुविधा उपलब्ध करून दिल्यास मोठ्या प्रमाणावर खर्चिक पर्यटक येऊन स्थानिकांना रोजगाराच्या संधी प्राप्त होऊ शकतात.

### पर्यायी मार्गाची दिशा

**पनवेल (धोदाणी) येथून फिनिक्युलर रेल्वे सेवा तसेच आदिवासी वाडीतून थेट सनसेट पॉईंट पर्यंत मोटार रस्ता निर्माण होऊ शकतो. याच रस्त्याचे भूमिपूजन तत्कालीन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते चार दशकांपूर्वी करण्यात आले होते. तसेच, कर्जत-डीकसळ येथून गारबट पॉईंट मार्गे माधवजी पॉईंट पर्यंत प्रस्तावित असणारा रोपवे प्रकल्प सुरू होऊ शकतो. तर, चौक येथून रामबाग पॉईंट पर्यंत मोटार वाहन रस्ता केवळ चार किलोमीटर अंतराचा आहे. हा मार्ग सुध्दा शासनाने ठरविल्यास उपलब्ध होऊ शकतो.**

### प्रवाशांचा हिरमोड

**नेरळ माथेरान घाटरस्त्यात प्रत्येक सुट्ट्यांमध्ये घाटात प्रचंड वाहतूक कोंडी होत असते. यामुळे पर्यटकांना आपल्या मुलाबाळांना सामानसुमान घेऊन स्वतःच्या गाड्या घाटात पार्क करून पायपीट करावी लागते. अपंग व्यक्तीला आणताना सुद्धा पर्यटकांना तारेवरची कसरत करावी लागत असून सुखकर प्रवास होत नसल्याने त्यांचा हिरमोड होत आहे.**

# वाघ नदीवरील जीवघेणे खड्डे

**। पालघर । प्रतिनिधी ।**

जव्हार आणि मोखाडा या दोन तालुक्यांना जोडणाऱ्या नाशिक-डहाणू महामार्गावर घाटकपाडा गावाशेजारील वाघ नदीच्या पुलाजवळ रस्त्याच्या मधोमध दोन मोठे खड्डे पडलेले आहेत. हे खड्डे प्रवाशांसाठी धोकादायक ठरू लागले आहेत. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने जर वेळीच या खड्ड्यांची दुरुस्ती केली नाही तर भविष्यात मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता प्रवाशांकडून वर्तविली जात आहे.



या महामार्गावर दिवसेंदिवस वाहनांची संख्या वाढत चालली असून गुजरात राज्यातून आद्य ज्योतिर्लिंग त्र्यंबकेश्वर येथे दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची संख्या सुद्धा अधिक आहे. तर, रोजच मोखाड्याहून जव्हारला ये-जा करणारे विद्यार्थी, चाकरमानी, रुग्ण, कार्यालयीन कर्मचारी यांची वर्दळ अधिक असते. मात्र, वाघ नदीच्या पुलावरील उताराजवळ दोन खड्डे असल्याने उतारावरून येणारी वाहने वेगाने येतात आणि जोरात आदळतात. यामुळे वाहनांचे तर नुकसान होतेच, परंतु वाहनातील प्रवाशांना सुद्धा त्याचा त्रास सहन करावा लागत आहे. महत्वाची बाब म्हणजे या रस्त्याची सुधारणा अवघ्या दोन वर्षांपूर्वी केलेली असतानाही पुन्हा त्याच ठिकाणी नव्याने खड्डे पडतात कसे, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

# पोलिसांना भर रस्त्यात मारहाण

**। पालघर । प्रतिनिधी ।**

उल्हासनगरात काही बोगस ऑटो रिक्षा चालकांची अरेरावी वाढली आहे. शुक्रवारी भर रस्त्यात काही ऑटो चालकांनी उड्डान पुलावर एका अल्पवयीन मुलीच्या दुचाकीला धडक मारून तिला मारहाण केली. तसेच, गाडीची चावी हिसकावण्याचा प्रयत्न देखील केला. यावेळी वाहतूक पोलिसांनी या रिक्षा चालकांना पकडण्याचा प्रयत्न केला असता रिक्षा चालकांनी पोलिसांनाच भर रस्त्यात मारहाण केली. या मारहाणीचा व्हिडीओ व्हायरल झाल्याने शहरात एकच खळबळ उडाली आहे. या प्रकरणी मध्यवर्ती पोलिसांनी एका रिक्षा चालकाला ताब्यात घेतले.

कॅम्प नंबर तीन आणि चारला जोडणाऱ्या शाहू महाराज उड्डान पुलावर एक लहान मुलगी जात असताना एका रिक्षा चालकाने या मुलीच्या दुचाकीला धडक मारली तसेच गैरवर्तन केले. नागरिकांनी त्याला रोखण्याचा प्रयत्न केला. यावेळी कर्तव्यावर तैनात असलेले मोहन पाटील तसेच इतर दोन वाहतूक पोलिसांना हा प्रकार समजताच त्यांनी रिक्षा चालकाचा पाठलाग करून त्याला पकडले. यावेळी पोलिसांनी चालकाला पोलीस ठाण्यात चलण्यास सांगितले असता चालकाने मोहन पाटील यांना मारहाण करण्यास सुरुवात केली. बचावासाठी आलेले वाहतूक पोलीस वाघ आणि वार्डन संदीप यांना देखील मारहाण तसेच शिविगाळ करण्यात आली. यावेळी मध्यवर्ती पोलीस तातडीने या ठिकाणी आले असता त्यांनी ऑटोचालकाला ताब्यात घेत पोलिसांनी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे.

# पिरकोन गावात विकासकामांना वेग

**। उरण । वार्ताहर ।**

गणेशोत्सवाच्या निमित्ताने पिरकोण ग्रामपंचायतीने अंतर्गत रस्त्यांचे काँक्रीटीकरण करण्याचे काम हाती घेतल्याने पिरकोण गावातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे. तसेच, पिरकोण गावच्या सरपंच कलावंती पाटील, उपसरपंच दिपक पाटील तसेच ग्रामपंचायत सदस्य यांचे आभार व्यक्त केले आहेत.



पिरकोण गावाचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी पिरकोण गावातील कृष्णा पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्य जीवन गावंड, मुकुंद गावंड, अनिल पाटील तसेच गावातील विविध पक्षांचे पदाधिकारी कार्यकर्ते हे हिरीरीने सहभाग घेत आहेत. गणेशोत्सवात गावातील नागरिकांना, भाविकांना सुखकर प्रवास व्हावा यासाठी दिपक पाटील यांनी कलावंती पाटील तसेच ग्रामपंचायत सदस्य व विविध पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते यांच्या मार्गदर्शनाखाली गावातील रस्त्यांचे काँक्रीटीकरण करण्याचे काम हाती घेतले आहे. एकंदरीत खड्डे युक्त रस्ता, खड्डे मुक्त झाल्याने पिरकोण गावातील नागरिकांनी व भाविकांनी समाधान व्यक्त केले आहे.

## अपघातात बारा वर्षीय मुलीचा मृत्यू

**। पालघर । प्रतिनिधी ।**

मांडवी येथे राहणारे धनंजय पाटील आपल्या दुचाकीवरून दोन्ही मुलांना घेऊन उसगाव येथे गेले होते. घरी परतत असताना चांदीप जवळ पोहचताच भरधाव वेगाने येणाऱ्या आयशर टेम्पोने दुचाकीला धडक दिल्याने अपघात घडला. या अपघातात धनंजय पाटील आणि त्यांची दोन्ही मुले दूरवर फेकली गेली. यावेळी मुलगी मानसी पाटील हिच्या डोक्यावरून गाडीचे चाक गेल्याने तिचा जागीच मृत्यू झाला. तर, मुलगा ओमकारला डोक्यात दुखापत झाली असून टेम्पो चालक पळून गेला आहे. याप्रकरणी मांडवी पोलीस ठाण्यात चालका विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

# ऐन गणेशोत्सवात नागरिकांचे हाल

**। तळा । वार्ताहर ।**

तळा शहर आणि ग्रामीण भागात गेल्या काही दिवसांपासून विजेचा लपंडाव सुरू असल्याने नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. पाणीपुरवठा केंद्रांच्या ठिकाणीही वीजपुरवठा विस्कळित झाला असल्याने प्रामुख्याने तळा शहरातील नागरिकांचे हाल होत आहेत. तळा बाजारपेठ आणि परिसरात सतत वीजपुरवठा खंडित होण्याचे प्रकार घडत आहेत. गेल्या आठवडाभरापासून हे प्रकार सुरू असल्याने नागरिकांची अडचण निर्माण झाली आहे. विशेष म्हणजे तालुका शेतकरी संघटनेची महावितरण पदाधिकारी यांच्या सोबत संवाद बैठक पार पडल्या नंतर विजेच्या लपंडावात भर पडली आहे. महावितरण उपअभियंता घावरे यांनी




दिलेले आश्वासन फोल गेले आहे. तसेच, वीजपुरवठा वारंवार खंडित होत असल्याने याचा परिणाम विजेवरील उपकरणांवरही होत असल्याच्या तक्रारी देखील नागरिकांकडून करण्यात आल्या आहेत.

तळा शहर आणि ग्रामीण भागातील पाणीपुरवठा केंद्रातील वीजपुरवठा विस्कळित झाला असल्याने पाणीपुरवठा व्यवस्था कोलमडली आहे. गणेश उत्सवासाठी हजारोंच्या संख्येने चाकरमानी, गणेश भक्त गावाकडे आले आहेत. परंतु, विजेच्या लपंडावामुळे आणि पाणी नसल्याने हैराण झाले आहेत. वीजपुरवठा खंडित होण्याच्या प्रकारांमध्ये पावसामुळे भर पडली आहे. पावसामुळे फिडर आणि ट्रान्सफार्मरमध्ये बिघाड होऊन तळा शहर आणि परिसर सतत अंधारात जात आहेत. वीजपुरवठा खंडित झाल्यानंतर तो पूर्ववत होण्यासाठी विलंब लागत आहे. यामुळे दैनंदिन कामकाजामध्ये अडथळे येत असल्याच्या तक्रारी या परिसरातील नागरिकांकडून करण्यात येत आहेत. महाविरणकडे तक्रार नोंदविण्यासाठी टोल फ्री क्रमांक उपलब्ध नसल्यामुळे नागरिकांना महावितरण कार्यालयात जाऊन सतत तक्रारी नोंदविण्याची वेळ येत आहे.

# रेल्वे पोलिसांची तडकाफडकी बदली

**। पालघर । प्रतिनिधी ।**

पश्चिम रेल्वेच्या बोईसर रेल्वे रुळालगत रील बनवणाऱ्या विद्यार्थ्यांकडून अवैधपणे पैशांची वसुली करणाऱ्या रेल्वे पोलीस दलातील तीन कर्मचाऱ्यांची तडकाफडकी बदली करण्यात आली आहे. या कर्मचाऱ्यांची वरिष्ठ स्तरावरून चौकशी करण्यात येऊन पुढील कारवाई केली जाणार आहे.




बोईसरच्या अवधनगर परिसरातील १६ ते १८ वयोगटातील महाविद्यालयीन विद्यार्थी बोईसर स्थानकाजवळील रेल्वे रुळालगत मोबाईलमधून रील बनवत होते. यावेळी बोईसर रेल्वे स्थानकात कार्यरत रेल्वे पोलीस दलातील देवेंद्र कुमार, अरविंद सिंग आणि देवेंद्र सिंग या तीन कर्मचाऱ्यांनी रील बनवणाऱ्या तीन महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना ताब्यात घेऊन रुळालगत विनापरवानगी रील बनवण्याचे कारण देत कारवाई करायची नसेल तर पाच हजार रुपयांची मागणी केली. मात्र, विद्यार्थ्यांकडे इतके पैसे नसल्याने त्यांना जवळपास तीन ते चार तास थांबवून ठेवण्यात आले होते. अखेर रेल्वे पोलीस कर्मचाऱ्यांना अडीच हजार रुपये दिल्यानंतर विद्यार्थ्यांची सुटका करण्यात आली.

यातील एका विद्यार्थ्याने पैसे देतानाची चित्रफित आपल्या आपल्या मोबाईलमध्ये रेकॉर्ड केली होती. विद्यार्थ्यांकडून रेल्वे पोलिसांनी पैसे घेतानाची चित्रफित समाज माध्यमांवर व्हायरल झाल्यानंतर खळबळ माजली. या प्रकरणाची रेल्वे पोलीस दलातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी गंभीर दखल घेत तिन्ही कर्मचाऱ्यांची तडकाफडकी बदली केली असून चौकशीनंतर त्यांच्यावर आवश्यक कारवाई केली जाणार आहे.

## नरेश म्हात्रे यांचे निधन

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

उरण येथील आवरे येथील नरेश धर्माजी म्हात्रे यांचे निधन झाले आहे. राजिप मधील शिक्षक म्हणून कर्जत



तालुक्यात ३० वर्षे त्यांनी सेवा दिली आहे. मागील काही महिने कर्करोगाने ते त्रस्त होते. रुग्णालयात उपचार घेत असताना त्यांचा मृत्यू झाला असून त्यांच्यावर आवारे गावी अंत्यसंस्कार करण्यात आले. कामानिमित्त नरेश हे नेरळ येथे राहत होते.

# शेतकरी उत्पादक कंपनीची स्थापना

**। तळा । वार्ताहर ।**

तालुक्यातील प्रधानमंत्री सुक्ष्म २.० योजनेतून तालुक्यातील अकरा गावातील २५ शेतकरी गटांच्या माध्यमातून ५०० शेतकऱ्यांच्या सदस्यांमधून दहा संचालकाची निवड करण्यात आली आहे. तळा कृषी कार्यालयात पार पडलेल्या बैठकीत या कंपनीच्या अध्यक्षपदी विलास कदम, उपाध्यक्षपदी आप्पा दळवी तर कोषाध्यक्ष पदी कृष्णा भोसले यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. या बैठकीत तालुका कृषी अधिकारी आनंद कांबळे, मृद व जलसंधारण अधिकारी मंगेश साठे, आशा मोहीते, आदी मान्यवर उपस्थित होते.

या बैठकीत तालुका कृषी अधिकारी आनंद कांबळे यांनी सखोल मार्गदर्शन केले. कृषी, पणन, जलसंधारण, अशा माध्यम ातून शेतकरी उत्पादक कंपनीने आपल्या सर्व सदस्यांना हाताला काम मिळेल त्याचबरोबर कंपनीची आर्थिक प्रगती कशी होईल यासाठी प्रत्येकाने परिश्रम घेतले पाहीजेत. यासाठी प्रयत्नात कुठे कमी पडणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. शासनाच्या माध्यमातून ही कंपनी येत्या तीन वर्षांत आपली प्रगती साधेल आपला पाया मजबूत करेल अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

यावेळी कंपनीच्या अनेक विषयांवर चर्चा करण्यात आली. आपल्या कंपनीच्या माध्यमातून सेंद्रिय शेती करण्यासाठी ५०० हेक्टरवर जबाबदारी घ्यावी, असे सांगण्यात आले. याबाबत शेतकरी बांधवाना विश्वासात घेऊन यावर विचार केला जाईल, असे ठरविण्यात आले.

### अपघाती मृत्यू झाल्यास १० लाखांची मदत

# आशा सेविका, गटप्रवर्तकांना दिलासा

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

आरोग्यविषयी जनजागृती, प्रोत्साहन देणे, माता व बालआरोग्य या विविध कामांच्या जबाबदाऱ्या यशस्वीरीत्या पार पाडणाऱ्या आशा स्वयंसेविका व गटप्रवर्तकांना राज्य शासनाने मोठा दिलासा दिला आहे. सेवा बजावताना अपघाती मृत्यू झाल्यास १० लाख, कायमस्वरूपी अपंगत्व आल्यास ५ लाखांची मदत शासनाने जाहीर केली आहे. आरोग्ययंत्रणा, सेवाभावी संस्था व ग्रामस्थ, समाजातील अन्य घटक यामध्ये आरोग्यासंदर्भात जागरुकता, सुसंवाद, समन्वय, प्रोत्साहन निर्माण करण्याच्यादृष्टीने आशा स्वयंसेविका व गटप्रवर्तक महत्त्वपूर्ण सामाजिक




दुवा म्हणून कार्यरत आहेत.

आशा स्वयंसेविकांचा माता आरोग्य, बालआरोग्य, कुटुंब नियोजन इत्यादी कारणांसाठी नियमित गृहभेटी देणे, माता व बालकांना मार्गदर्शन करणे, रुग्णांना प्राथमिक आरोग्यकेंद्र, ग्रामीण रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय, जिल्हा रुग्णालय येथे उपचारासाठी दाखल करणे अशा प्रकारची कर्तव्ये आशा स्वयंसेविका व गटप्रवर्तकांना बजवावी लागत असतात. १ एप्रिलपासून हा निर्णय लागू होणार असल्यामुळे आशा स्वयंसेविका, गटप्रवर्तकांना दिलासा मिळाला आहे.

### जिल्ह्यात १ हजार आशासेविका कार्यरत

**रत्नागिरी जिल्ह्याच्या ग्रामीण व शहरी भागात १ हजार २०० आशा स्वयंसेविका कार्यरत आहेत. तर, १०० गटप्रवर्तक कार्यरत असल्याची माहिती जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागामार्फत देण्यात आली आहे. शासनाने जाहीर केलेल्या योजनांचा लाभ आशा स्वयंसेविका व गटप्रवर्तकांना होणार आहे.**

# पोलिसांचे चाकरमान्यांसाठी चोख नियोजन

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांना मुंबई-गोवा महामार्गावरून प्रवास करताना त्रास होऊ नये म्हणून महामार्ग वाहतुक पोलीस २४ तास तैनात करण्यात आले आहेत. महामार्गाच्या अपूर्ण कामामुळे वाहतुक कोंडी होत असल्याने पोलिसांना ती सोडविताना कसोटी लागत आहे. तरीही ते वाहतुक सुरळीत ठेवत आहेत.



याबाबत रत्नागिरी विभागाच्या पोलीस निरीक्षक दिपाली जाधव यांनी सांगितले की, रत्नागिरी विभागातील मुंबई-गोवा महामार्गाची चिपळूण ते कसाल (जि.सिंधुदुर्ग) अंतराची हद्द रत्नागिरी विभागा अंतर्गत येते. यामध्ये असणाऱ्या तीन महामार्ग वाहतुक पोलीस मदत केंद्राच्या माध्यमातून, पेंडॉल बंदोबस्त व सुरक्षा गस्त करण्यात येत आहे. याकरिता महामार्ग वाहतुक पोलीस मदत केंद्र कशेडी, चिपळूण, हातखंबा असे १२४ नियमित व बाहेरील अधिकारी व कर्मचारी यांची नेमणूक करण्यात आली आहे.

यामध्ये महामार्गावर चाकरमान्यांच्या वाहनांची मोठ्या प्रमाणावर वर्दळ असल्याने व महामार्ग चौपदरीकरणातील प्रलंबित कामामुळे होणारी वाहतुक कोंडी कमी करण्याचा प्रयत्न केला जात आहे. तसेच, पोलिसांची नजर चुकवून महामार्गावर बंदी असतानाही अवजड वाहनांची वाहतूक होत असल्याने त्यावर कारवाई करून थांबविण्यात आले आहेत. शिवाय महामार्गावर असणाऱ्या बाजारपेठांमध्ये ग्राहकांच्या वाहनांची होणारी गर्दी कमी करून वाहतुक व्यवस्था सुरळीत ठेवण्यात येत आहे. यामुळे चाकरमान्यांना कमी त्रासात सुलभ प्रवास करता येतो आहे.

## हिरवळ महाविद्यालयात व्यावसायिक उपक्रम

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

हिरवळ एज्युकेशन ट्रस्ट महाविद्यालयात महाड मधील व्यवस्थापन विभागाच्या मार्फत 'इंटरप्रिनियरशिप ओएसिस मार्वलस मेकर्स मार्केट' यावर उपक्रम आयोजित करण्यात आला होता. या उपक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये व्यावसायिक संबंधी आवश्यक ज्ञान, कौशल्य, विविध संधी, मुलांना स्वतःचे कौशल्य सिद्ध करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देणे हा होता. प्रथमतः हिरवळ एज्युकेशन ट्रस्टच्या मुख्य सल्लागार डॉ. संध्या कुलकर्णी व प्राचार्य सुदेश कदम यांच्या हस्ते उपक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. या उपक्रमात जवळपास १५ विविध प्रकारचे स्टॉल्स विद्यार्थ्यांनी मांडले होते. यात खाद्यपदार्थ, फनी गेम्स, आर्ट अँड क्राफ्ट, आर्टिफिशियल ज्वेलरी यांचा समावेश होता.

# मच्छिमारांना डिझेल कोट्याची प्रतीक्षा

## अनुदानास मंजुरी नसल्याने मच्छिमारांना आर्थिक भुर्दंड

**। उरण । प्रतिनिधी ।**

**एक ऑगस्टपासून मासेमारीचा नवा हंगाम सुरू झाला आहे. हंगाम सुरू होऊन महिना पूर्ण झाला असतानाही येथील मच्छिमारांना सरकारकडून मिळणाऱ्या डिझेल कोट्याची प्रतीक्षा कायम आहे. त्यामुळे हजारो मच्छिमारांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे. हा कोटा सरकारने लवकरात लवकर मंजूर करावा, अशी मागणी मच्छिमारांनी शासनाकडे केली आहे.**



मासेमारी करणाऱ्यांना शासनाकडून मासेमारीसाठी वापरण्यात येणाऱ्या बोटींना वर्षाकाठी ३५ हजार लिटर डिझेल दिले जाते. या डिझेलवर शासनाकडून डिझेलवरील व्हॅट किंवा लिटरमागे १८ रुपयांची सूट दिली जात आहे. यालाच मच्छीमार डिझेल परतावा असे म्हणतात. हे तेलावरील अनुदान शासनाच्या मत्स्य विभागाने त्याचा कोटा मंजूर केल्याशिवाय मिळत नाही. त्यामुळे महिनाभरापासून मच्छीमारांना या कोट्याविना मासेमारी करावी लागत आहे. तर मागील दोन ते तीन महिन्यांचे डिझेलवरील परतावेही थकले आहेत. याचा परिणाम मासेमारीच्या नव्या हंगामावर झाला आहे.

पावसाळ्यात घातलेली खोल समुद्रातील मासेमारी बंदी उठविण्यात आली आहे. त्यामुळे १ ऑगस्टपासून मासेमारी सुरू झाली आहे. यात प्रामुख्याने नारळी पौर्णिमेनंतर समुद्र शांत झाल्याने मासेमारी जोमाने सुरू झाली आहे. तर १५ ऑगस्टपासून मुंबईतील ससून डॉक ऐवजी उरणच्या करंजा बंदरात सुरू झालेल्या मासळी बाजारामुळे खरेदीसाठी मोठी गर्दी होऊ लागली आहे. स्वस्त दरात मासळी खरेदी करण्यासाठी मुंबई, कल्याण, अलिबाग, ठाणे येथील व्यावसायिक आणि स्थानिक रहिवासी हे करंजा बंदरात येऊ लागले आहेत. तालुक्यातील किनारपट्टीवरील करंजा, मोरा, दिघोडे, आवरे परिसरांत मोठ्या प्रमाणात खोल समुद्रातील मासेमारी करण्यात येत आहे. यामध्ये, सुमारे ७०० पेक्षा अधिक मासेमारी बोटी असून मासळीची खरेदी- विक्री करण्यासाठी त्यांना मुंबईतील ससून डॉक आणि भाऊचा धक्का येथे जावे लागत होते. राज्य आणि केंद्र सरकारच्या माध्यमातून ६०० मीटर लांबीचे फिशिंग-डॉक करंजा येथे उभारण्यात आले आहे. यामध्ये, मासेमारी बोटीतील मासळी बंदरात उतरवून त्याच्या खरेदी-विक्रीला सुरुवात करण्यात आली आहे. यामुळे, नव्याने सुरू झालेल्या करंजा द्रोणागिरी मत्स्य व्यवसाय बंदर येथे अनेक व्यापारी आणि स्थानिक मासळी खरेदी करण्यासाठी गर्दी करू लागले आहेत.

> “ जिल्हा मत्स्य विभागाने १ हजार ४०० बोटींना डिझेल कोटा मिळावा म्हणून प्रक्रिया सुरू केली आहे. तसेच डिझेल कोट्याची ही मागणी केली आहे.
> – संजय पाटील, सहआयुक्त, जिल्हा मत्स्यव्यवसाय विभाग, रायगड ”

> “ मासेमारीचा नवा हंगाम सुरू झाला आहे. मात्र सर्व मच्छीमारांना डिझेल कोटा मिळालेला नाही. काही बोटींना मिळालेला आहे.
> – प्रदीप नाखवा, अध्यक्ष, करंजा मच्छिमार सहकारी संस्था, उरण ”

### करंजा बंदरामुळे ‘ससून’ वर परिणाम

उरणच्या करंजा व मोरा येथील शेकडो मच्छीमार बोटी अनेक वर्षे मुंबईतील ससून बंदरात मासळी विक्री करीत होते. मात्र सध्या या बोटी नव्या करंजा बंदरात मासळीचा व्यापार करीत आहेत. त्यामुळे ससून बंदराच्या व्यवसायावर परिणाम झाला आहे.



# महागाव-कोरखंडे रस्त्यावर खड्ड्यांचे साम्राज्य

**। तळा । वार्ताहर ।**

तळा तालुक्यातील महागाव ते कोरखंडे रस्त्याची दुरवस्था झाली असून या रस्त्यावर पडलेल्या खड्ड्यांमुळे ग्रामस्थांसह गणेशोत्सवासाठी गावी आलेल्या चाकरमान्यांमधून नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.महागाव कोरखंडे रस्त्याची अक्षरशः चालण झाली असून या रस्त्यावरून प्रवास करताना वाहन चालकांना तारेवरची कसरत करावी लागत आहे.

सध्या गणेशोत्सवासाठी मोठ्या प्रमाणावर मुंबईकर चाकरमानी गावी परतले आहेत.मात्र गावच्या रस्त्याची झालेली दुरवस्था पाहून त्यांच्याकडून संताप व्यक्त केला जात आहे. याबाबत महागाव ग्रामपंचायतीतर्फे उपअभियंता बांधकाम विभाग अलिबाग यांना पत्राद्वारे सदर खड्डे भरण्याची विनंती करण्यात आली आहे. मात्र याला महिनाभराचा कालावधी उलटत आला तरी त्याची कोणत्याही प्रकारे दखल घेण्यात आलेली नाही.या रस्त्यावरून बस, टेम्पो यांसह दुचाकी चारचाकी वाहनांची कायम वर्दळ असून ऐन गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांना खड्ड्यातून प्रवास करावा लागत आहे.त्यामुळे या रस्त्याच्या दुरावस्थेबाबत नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.

# रायगडात पावसाने सरासरी ओलांडली

**। रायगड । प्रतिनिधी ।**

जिल्ह्यात पावसाने यंदा वार्षिक सरासरी ओलांडली आहे. आत्तापर्यंत सरासरी ३ हजार २९५ मिलीमीटर पावसाची नोंद झाली आहे. हे प्रमाण वार्षिक पर्जन्यमानाच्या तुलनेत १०६ टक्के आहे.

जिल्ह्यात जून महिन्यात सरासरीच्या तुलनेत कमी पाऊस पडला होता. मात्र जुलै महिन्यात पावसाने कसर भरून काढली. ऑगस्ट महिन्यातही समाधान कारक पाऊस पडला. त्यामुळे पावसाने तीन महिन्यातच वार्षिक पर्जन्यमानाची सरासरी गाठली आहे. सप्टेंबर महिन्यातही चांगल्या पावसाचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. जिल्ह्यात पुढील पाच दिवसात मध्यम ते तीव्र पावसाचा अंदाज प्रादेशिक हवामान विभागाने व्यक्त केला आहे. त्यामुळे यंदा सरासरीच्या तुलनेत पावसाचे प्रमाण अधिक राहणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

जिल्ह्यात दरवर्षी सरासरी ३ हजार १०१ मिलीमीटर पाऊस पडतो. त्या तुलनेत ऑगस्ट अखेर पर्यंत सरासरी ३ हजार २९५ झाला आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत यावर्षी ऑगस्ट अखेर पर्यंत ३०० मिमी अधिक पावसाची नोंद झाली आहे. अलिबाग २ हजार ७६९ मिमी, मुरुड २ हजार ५८५ मिमी, पेण ३ हजार १७४ मिमी, पनवेल ३ हजार ०३९ मिमी, उरण २ हजार ४४४ मिमी, कर्जत ३ हजार ६८४ मिमी, खालापूर ३ हजार ५२२ मिमी, सुधागड ३ हजार ६५८ मिमी, रोहा ३ हजार २४६ मिमी, माणगाव २ हजार ७८१ मिमी, तळा ३ हजार ७०८ मिमी, महाड ३ हजार ३४० मिमी, पोलादपूर ३ हजार ७४८ मिमी, म्हसळा ३ हजार ४२३ मिमी, श्रीवर्धन २ हजार ६४४ मिमी, माथेरान ४ हजार ९६७ मिमी पावसाची नोंद झाली आहे.

### पुरस्कार वितरण सोहळा

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

विवा कॉलेजचा पुरस्कार वितरण सोहळा कॉलेजचे पदाधिकारी व मान्यवरांच्या उपस्थितीत उत्साहात संपन्न झाला. या सोहळ्यात विविध क्षेत्रातील मान्यवरांना कॉलेजतर्फे पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

विवा कॉलेज माणगावमध्ये तज्ञ शिक्षकांकडून विविध कोर्सेस शिकविले जात असून जवळपास ३५० विद्यार्थी या कॉलेजमध्ये विविध कोर्सेसचे शिक्षण घेत आहेत.विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास पाहणारा हा कॉलेज अल्पावधीत नावारूपाला आला आहे.



कोकणातील शेतघर हे पर्यटकांचे प्रमुख आकर्षण ठरले आहे. मुरूड तालुक्यातील वाणदे गावातील शेतघर टिपले आहे शंतनू नाझरे यांनी

# जेएसएममध्ये राष्ट्रीय सेवा योजनेचे नियोजन

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

मुंबई विद्यापीठ आणि जे. एस. एम. कॉलेज एन. एस. एस. युनिटच्या माध्यमातून राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकाऱ्यांसाठी रायगड जिल्हास्तरीय नियोजन सत्र संपन्न झाले.

या कार्यक्रमासाठी जनता शिक्षण मंडळाचे अध्यक्ष अ‍ॅड. गौतम पाटील, सुशील शिंदे, रमेश देवकर, तुळशीदास मोकल, निखिल कारखानीस, प्राचार्या डॉ. सोनाली पाटील, डॉ. प्रविण गायकवाड, प्रा. अश्विनी आठवले, डॉ. पंकज घरत तसेच रायगड जिल्ह्यातील विविध महाविद्यालयातील ८० एन.एस. एस. कार्यक्रम अधिकारी सहभागी झाले होते. सुशील शिंदे यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले कि, राष्ट्रीय सेवा योजना ही एक प्राध्यापकांकारिता संधी आहे ज्यामध्ये प्राध्यापक विद्यार्थ्यांसोबत सामाजिक उपक्रम राबवून व्यक्तीमत्व विकास साधू शकतात.



अ‍ॅड. गौतम पाटील यांनी आपले अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना सांगितले कि, एन. एस. एस. हे एक व्यक्तीमत्व विकासाचे व समाजसेवेचे उत्कृष्ट माध्यम आहे. तसेच त्यांनी आपण एन. एस. एस. स्वयंसेवक म्हणून काम करत असतानाचे अनुभव सांगितले. आपल्या मनोगताच्या शेवटी अध्यक्ष अ‍ॅड. गौतम पाटील यांनी नियोजन सत्रासाठी शुभेच्छा दिल्या व मुंबई विद्यापीठाने जे. एस. एम. कॉलेजला नियोजन सत्र आयोजित करण्याची संधी दिली त्याबद्दल आभार व्यक्त केले. याप्रसंगी जे.एस. एम. महाविद्यालयाचे एन. एस. एस. कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रविण गायकवाड यांची विभागीय समन्वयकपदी नियुक्ती करण्यात आली. व त्यांना मुंबई विद्यापीठाचा रायगड जिल्हास्तरीय उत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी पुरस्कार मिळाला म्हणून मुंबई विद्यापीठाचे एन. एस. एस. कार्यक्रम अधिकारी रमेश देवकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

# कोलाड पोलिसांचा रूट मार्च !

**। कोलाड । वार्ताहर ।**

गणेशोत्सव तसेच नवरात्र उत्सव सणाच्या अनुषंगाने रोहा उपविभागीय पोलिस अधिकारी रवींद्र दौडकर व कोलाड पोलीस अधिकारी नितीन मोहिते यांच्या मार्गदर्शनाखाली कोलाड पोलीस ठाणे येथून मुंबई- गोवा महामार्गाने कोलाड नाका- बाजारपेठ येथून आंबेवाडी-रोहा-कोलाड रोडपर्यंत रूटमार्च काढण्यात आला.



आजपासून सुरू होणारा गणेशोत्सव, तसेच नवरात्रौत्सव काही दिवसावर येवून ठेपला असल्याने कोलाड पोलीस ठाण्याच्या हद्दीत कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू नये म्हणून पोलीस अधिकारी व पोलीस कर्मचारी दक्ष झाले असून त्यानी कोलाड बाजारपेठेतून रूट मार्च काढीत दंगा काबू प्रात्यक्षिक घेण्यात आले. त्यानंतर रंगीत तालमीची सांगता करण्यात आली.

# पनवेल-कर्जत रेल्वे बोगद्याच्या कामाविरुद्ध उपोषणाचा इशारा

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत - पनवेल या नवीन मार्गावर किरवली येथे बोगदा बांधला जात आहे.या बोगद्याचे कामामुळे तेथील रहिवाशांचे घरांचे तसेच पाण्याच्या विहिरीचे मोठे नुकसान झाले आहे. दरम्यान, रेल्वे ठेकेदाराकडून स्थानिकावर अन्याय सुरू असून त्या विरुद्ध उपोषण करण्याचा इशारा आरपीआय आठवले गटाने दिला आहे.

पनवेल - कर्जत या रेल्वे मार्गावर नवीन मार्गिका टाकली जात आहे.त्यासाठी नव्याने बोगदा खोदला जात आहे. किरवली गावाजवळ बनविण्यात येत असलेल्या बोगद्याचे काम गेली दोन वर्षे सुरू आहे. हा बोगदा बांधण्याच्या कामासाठी सातत्याने सुरुंग स्फोट केले जात असून त्यामुळे किरवली आणि हालीवली गावातील घरांचे नुकसान सुरू आहे. हे नुकसान होण्याचे सत्र गेली दोन वर्षे सुरू असून रेल्वेकडून सुरू असलेल्या अन्यायाविरुद्ध स्थानिक पातळीवर अनेक निवेदने प्रशासनाला देण्यात आली. स्थानिक माजी सरपंच यांनी आतापर्यंत तीनवेळा उपोषणे केली असून अधिकारी वर्ग लेखी आश्वासन देऊनदेखील कोणत्याही प्रकारची कार्यवाही होत नाही. त्यामुळे स्थानिक नुकसानग्रस्त ग्रामस्थ तसेच विहिरीचे पाणी गायब झाल्याने शेतकरी संतप्त आहेत.

या अन्यायाविरुद्ध आता आरपीआय आठवले गटाने आक्रमक भूमिका घेतली आहे. आठवले गटाने जिल्हाधिकारी आणि पोलीस प्रशासनाला निवेदन देऊन नुकसानग्रस्त ग्रामस्थ आणि शेतकरी यांच्या नुकसानीबद्दल न्याय दिला नाही तर याच महिन्याच्या अखेरीस उपोषण करण्याचा इशारा प्रशासनाला दिला आहे. आरपीआय आठवले गटाच्या वतीने हिरामण गायकवाड, जयेश शिंदे, किशोर गायकवाड, अलका सोनावणे, जिवक गायकवाड, विजय गायकवाड, अ‍ॅड. लक्ष्मण जाधव, निलेश गायकवाड, आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# मिहीर म्हात्रेला समाजरत्न पुरस्कार

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अलिबागच्या जे.एस.एम. कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजना युनिटमधील उत्कृष्ट कार्यामुळे मिहीर महेंद्र म्हात्रे यांना मनुष्यबल विकास लोकसेवा अकादमीच्या वतीने ‘राज्यस्तरीय आदर्श कार्यगौरव समाजरत्न पुरस्कार’ प्रदान करण्यात आला आहे. मिहीर हे आगरसुरे गावाचे रहिवासी असून, त्यांनी समाजसेवेच्या क्षेत्रात आपले अमूल्य योगदान दिले आहे.



मिहीर म्हात्रे यांनी युनिटच्या माध्यमातून अनेक सामाजिक उपक्रम राबविले आहेत. त्यांची समाजसेवेतली निष्ठा, कामातील समर्पण आणि तरुणाईला प्रेरणा देण्याची क्षमता पाहता, त्यांना या सन्मानाचा हकदार ठरविण्यात आले. मनुष्यबल विकास लोकसेवा अकादमीने त्यांच्या असामान्य योगदानाची दखल घेतली आहे.


## क्लासिफाईड
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- Office staff required for Office in Alibag Fresh graduates can come for interview Call 9923750549 Between 11 am to 6 pm
- महा-ई-सेवा/आधार केंद्राकरीता अनुभवी कॉम्प्युटर महिला ऑपरेटर पाहिजेत. इंग्रजी, मराठी टायपिंग आणि अनुभवी उमेदवारास प्राधान्य. संपर्क : श्री वरद ऑनलाईन सर्व्हिसेस. शंकर-पार्वती अपार्टमेंट समोर, शेतकरी भवन रोड, चेंढरे, अलिबाग लिव्ह अँड लायसन्स/ऑनलाईन रेंट अ‍ॅग्रीमेंट सर्व्हिस उपलब्ध. मो. ८३०८०२२६६४, (व्हाटसअ‍ॅप) ७३८५६११२९१
- सर्वप्रकारचे आजार, संतानप्राप्ती आर्युवैदिक निसर्गोपच्चाराने/ विवाहनोंदणी/कर्ज/ठेवींवर लाखास दरमहा ३०००/- घरबसल्या कामासाठी डॉ.नथुराम शिहू/रायगड ४०२१०६ (पोयनाड-नागोठणा) ७०२००८५२०९
- अलिबाग एस.टी.स्टॅन्ड समोर ‘अलिबाग प्राईड’ येथे पहिला माळा, ‘रोड फेसिंग’ सेमी कमर्शिअल फ्लॅट भाडेतत्वावर देणे/विकणे आहे. Area1000 sq.ft (2BHK Flat) Contact : 9579548535 ( स.९ ते सं.६)

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१


# दोन एसट्यांना अपघात

**। नागोठणे । वार्ताहर ।**

मुंबई-गोवा महामार्गावर नागोठणे औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या समोर गणेशोत्सवासाठी चाकरमान्यांना कोकणात घेऊन जाणाऱ्या व कोकणातून परतणाऱ्या दोन एसटी बस एकमेकांवर आदळल्याने झालेल्या अपघातात कोकणात जाणाऱ्या एसटी बसमधील सुमारे १८ प्रवासी व दोन्ही एसटी बसचे चालक,वाहक जखमी झाले आहेत.

या संदर्भात मिळालेल्या माहितीनुसार एसटी बस चालक मलिनाथ काशिनाथ कलशेट्टी (वय-४४) हे परळ ते राजापूर चाकरमानी प्रवाशांना घेऊन जात असताना मुंबई गोवा महामार्गावरील नागोठणे औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या समोर आले असता त्याचवेळी योगेश हिरालाल शिरसाट (वय ३४) हा प्रवाशी सोडून आपली रिकामी बस दहिवली (चिपळूण) - ठाणे ( रामचंद्र नगर) अशा परतीच्या प्रवासादरम्यान मुंबई कडे परतत असताना याचवेळी योगेश शिरसाट यांचे एसटी बसवरील नियंत्रण सुटल्याने समोरुन येणाऱ्या परळ -राजापूर या एसटी बसला समोरासमोर धडक दिली. यामध्ये परळ राजापूर या एसटी बसमधून प्रवास करणाऱ्या १८ प्रवाशांना हातापायाला, डोक्याला किरकोळ दुखापती होऊन जखमी झाले आहेत.

यामध्ये श्रीकांत चव्हाण (वय-६२), सई चव्हाण (वय-१२), सुवर्णा चव्हाण (वय-६०), भरत सावंत (वय-४१), गीता सावंत (वय-३४), अमोल बापर्डेकर (वय-३३), अमृता बापर्डेकर(वय-२७),अश्विनी शिगन (वय-४०), विद्या जाधव (वय-४०), शशिकांत जुलुम (वय-४९), राखी जुलुम (वय-२५), राकेश जुलुम (वय-२०) श्रावणी पनवीरकर (वय-२९), स्वप्निल चव्हाण (वय-३६), प्रसाद बंदरकर (वय-३४), मनोज सतोने (वय-२९), मेघना साबळे(वय-३५), सार्थक साबळे (वय-१२) या प्रवाशांचा समावेश आहे.




# मतदार प्रारूप यादीवर हरकतींचा पाऊस

## ■ यादीत नावे नसल्याच्या सर्वाधिक हरकती



**। रायगड । प्रतिनिधी ।**

विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने आता मतदार यादी अंतिम केली जात आहे. सध्या प्रारूप यादीवर जिल्हाभरातून तब्बल ४६ हजार ९३७ हरकती प्राप्त झाल्या असून, त्यात सर्वाधिक २० हजार ६४५ हरकती यादीत नावे समाविष्ट करण्याच्या आहेत. त्यानंतर १५ हजार ६९१ नावे यादीतून काढून टाकण्याच्या तर १० हजार ६०१ जणांनी नावासह अन्य बाबींच्या दुरुस्तीसाठी हरकती घेतल्या आहेत. यापैकी २९ हजार ७६० हरकती मान्य केल्या असून १२ हजार ८९० हरकती अमान्य केल्या आहेत. दाखल हरकतींपैकी २१६ हरकती प्रलंबित राहिल्या आहेत.

रायगड जिल्ह्याच्या सात विधानसभा मतदार संघातील अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. यामुळे आता पनवेल विधानसभा मतदारसंघात ६ लाख ३४ हजार १९७ मतदार, कर्जत ३ लाख १३ हजार ८८४ मतदार, उरण ३ लाख ३४ हजार ४३१, पेण ३ लाख ५ हजार ५१८ मतदार, अलिबाग ३ लाख २ हजार २६८, श्रीवर्धन २ लाख ६३ हजार ७१ मतदार आणि महाड विधानसभा मतदार संघात २ लाख ९२ हजार ७८४ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. यामुळे संपूर्ण रायगड जिल्ह्यात २४ लाख ४६ हजार १५३ मतदार असणार आहेत.

लोकसभा निवडणुकीवेळी अनेकांकडे मतदान ओळखपत्र होते, तरीदेखील त्यांना मतदानाचा हक्क बजावता आला नाही. या पार्श्वभूमीवर आता विधानसभा निवडणुकीत मतदानापासून वंचित राहणार नाही, याची दक्षता मतदारांपासून सर्वच राजकीय पक्षांच्या नेत्यांनी घेतला आहे. त्यामुळे विधानसभेच्या प्रारूप मतदार यादीत नाव नसलेल्या २० हजार ६४५ मतदारांनी हरकती घेत नाव समाविष्ट करण्याची मागणी केली होती. त्या सर्व हरकतींचा निपटारा करण्याची कार्यवाही पूर्ण झाली आहे.यामध्ये १८ हजार ८०१ हरकती मेनी झाल्या असून १ हजार ८३३ हरकती अमान्य करण्यात आल्या आहेत. ११ जणांच्या हरकती प्रलंबित राहिल्या आहेत.

मतदार यादीमधून नाव कमी करण्याच्या १५ हजार ६९१ हरकती दाखल झाल्या होत्या. यापैकी ५ हजार ४२४ हरकतीचा निपटारा करण्यात आला आहे. तर ६ हजार ५९ हरकती अमान्य करण्यात आल्या आहेत. १३७ मतदारांच्या हरकती प्रलंबित राहिल्या आहेत. मतदार यादीमधून नाव दुसऱ्या ठिकाणी स्थलांतरित करण्यासाठी १० हजार ६०० मतदारांनी हरकती दाखल केल्या होत्या. त्यापैकी ५ हजार ५३४ हरकती मान्य कार्नाय्त आल्या असून ४ हजार ९९८ हरकती अमान्य करण्यात आल्या आहेत. ६८ हरकती प्रलंबित राहिल्या आहेत. नावात दुरुस्ती करण्यासंदर्भातील केवळ एक हरकत दाखल होऊन त्या हरकतीवर निकाल दिला आहे.

### नवमतदारांना नाव नोंदविण्याची संधी

**जिल्ह्यात लोकसभा निवडणुकीच्याच ईव्हीएम वापरल्या जाणार असून, त्याची दुरुस्ती व तपासणी देखील सुरू आहे. ३१ ऑगस्टनंतर त्या ईव्हीएम सर्व तालुक्यांच्या ठिकाणी पोच करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. दरम्यान, अंतिम मतदार यादी प्रसिद्ध झाली तरीदेखील नवमतदारांना पुन्हा पुरवणी यादीच्या माध्यमातून नावे समाविष्ट करण्याची संधी असणार आहे.**

# १०१ गाड्यांच्या मुळ मालकाचा लावला शोध

**। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।**

कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्ह्यातील, अपघातातील, बेवारस अशी एकूण १०१ वाहने पोलीस ठाण्याच्या आवारात बऱ्याच कालावधीपासून जमा आहेत. त्यापैकी दुचाकी ४९, चार चाकी २७, श्री व्हिलर ६, अवजड वाहने १९ अशी एकुण १०१ वाहने अनेक वर्षापासून पडुन आहेत. त्यामुळे आरोग्याचा धोका निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. ही बेवारस वाहने ज्या मालकांची आहेत त्यांनी आपल्या वाहनाची कागदपत्रे दाखवून सात दिवसाच्या आत घेऊन जावेत अन्यथा पोलिसांकडुन त्या वाहनाची कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल असे आवाहन कळंबोली पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कदम यांनी केले होते. त्यानुसार पोलिसांनी यातील वाहनांच्या मालकाचा शोध लावला आहे.

पोलीस ठाण्यास शेकडो वाहने विविध गुन्ह्यात पोलीस जप्त करतात. मात्र न्यायालयीन प्रक्रीयेमुळे वाहनाचे मालक मिळुन येत नसल्याने ही वाहने पोलीस ठाणेच्या आवारात अनेक वर्ष मालकाच्या प्रतीक्षेत आहेत. या पार्श्वभूमीवर मिलींद भारंबे, पोलीस आयुक्त, नवी मुंबई यांनी मालकाचा शोध घेऊन ती वाहने त्यांच्या ताब्यात देण्याचे आदेश प्रभारी अधिकाऱ्यांना दिले. त्यानुसार परिमंडळ - २ पोलीस उपायुक्त प्रशांत मोहिते, पनवेल विभागाचे सहा. पोलीस आयुक्त अशोक राजपुत यांच्या मार्गदर्शनानुसार कळंबोली पोलिसांनी या वाहनाच्या मालकाचा शोध घेण्यास सुरूवात केली.

त्यासाठी पोलिसांनी परंदवाडी तळेगाव दाभाडे, ता. मावळ, जि. पुणे येथील गंगामाता वाहन शोध संस्थेची मदत घेतली. या संस्थेचे अध्यक्ष राम उदावंत यांनी कळंबोली पोलीस ठाणे येथील वाहनाची पाहणी केली उदावंत व पोलीसांनी बेवारस वाहनांचे चेसीस नंबर व इंजिन क्रमाकांवरून दोनच दिवसात १०१ वाहनाच्या मुळ मालकाचा शोध लावला. त्यासाठी पोलीस निरीक्षक गजानन घाडगे, पोलीस हवालदार दिपक वाशिमकर, मपोहवा संगिता माळी, महिला पोलीस शिपाई सुप्रिया शिंदे, मपोहवा अर्चना दांगट यांच्यासह गंगामाता वाहन शोध संस्थेचे अध्यक्ष राम उदावंत, उपाध्यक्ष बाळासाहेब बागडे, भारत वाघ यांनी परिश्रम घेतले. तसेच ज्या मालकांची वाहने असतील त्यांनी पोलीस ठाण्यात येऊन आपले वाहन तपासुन घेऊन जावे. तसेच सदरचे वाहन घेऊन न गेल्यास कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून त्यांचा लिलाव केला जाईल व त्यातुन आलेली रक्कम सरकारी तिजोरीत भरण्यात येईल असे वरिष्ठ पोलीस निरीक्षक कळंबोली राजेंद्र कदम यांनी सांगितले आहे.

# ब्रह्मचैतन्य मासिक संगीत सभा संपन्न

**। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।**

श्री ब्रह्मचैतन्य मासिक संगीत सभेचे ३४ वे पुष्प संपन्न झाले. पनवेल येथील गोंदवलेकर महाराज नामस्मरण केंद्रामधे संपन्न झालेल्या या कार्यक्रमात पुणे येथील युवा गायिका ईश्वरी कुलकर्णी-श्रीगार यांनी आपली सेवा सादर केली.

ईश्वरी ह्यांनी आपल्या संगीत सभेची सुरुवात राग श्याम कल्याणमधील जियो मेरो लाल ही बंदिश आणि सावन की सांज भयी ही बंदिश गाऊन गेली. त्यानंतर त्यांनी बेला सांज की ही बंदिश सादर केली. नंतर त्यांनी राग मेघमधील मेघश्याम घनश्याम हा तराणा सादर केला. नंतर त्यांनी कजरी हा गायन प्रकार देखील सादर केला.

त्यांनी सुर निरागस हो, अमृताहुनी गोड, बाजे रे मुरलीया बाजे, उघड नयन देवा हे अभंग आणि काटा रुते कुणाला व का धरिला परदेस ही नाट्यगीते सादर केली. तीर्थ विठ्ठल क्षेत्र विठ्ठल या अभंगाने संगीत सभेची सांगता केली. राजेंद्र काळे यानी संवादिनी, शार्दुल डोंगरे तबलासाथ व गणेश घाणेकर यानी तालवाद्य साथ केली. सुखदा मुळ्ये-घाणेकर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. संगीत सभा यशस्वी करण्यासाठी कार्यकर्त्यांनी मोलाचे योगदान दिले.

### दोघी मावस बहिणींचे अपहरण

**नवीन पनवेल :** राहत्या घरातून शाळेमध्ये जात आहे असे सांगून निघून गेलेल्या दोघी मावस बहिणी घरी परत न आल्याने अनोळखी इसमांनी त्यांचे अपहरण केल्याचा गुन्हा तळोजा पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आला. शाळेतील शिक्षकांचा फोन आला आणि परीक्षा असून देखील मुलगी शाळेत आली नसल्याचे सांगितले. यावेळी साडूची मुलगीदेखील परीक्षेसाठी शाळेत गेली नसल्याचे समजले. या दोघींचा परिसरात शोध घेतला यावेळी त्यासोबत त्यांचे कपडे, आधार कार्ड व पंधराशे रुपये घेऊन गेले असल्याचे समजून आले.

# मेडिकवर हॉस्पिटलमध्ये केमो डे केअर वॉर्ड सुरू

## ■ मंगेश चिवटे यांच्या उपस्थितीत शुभारंभ



**। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।**

कॅन्सरशी लढा देणाऱ्यांसाठी तसेच केमोथेरपी घेत असलेल्या रुग्णांसाठी नवी मुंबईच्या खारघर येथील मेडिकवर हॉस्पिटल्सने सुरक्षित आणि उत्तम दर्जाच्या सुविधा देण्यासाठी केमो डे केअर वॉर्ड सुरू केला आहे. मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी कक्षाचे प्रमुख मंगेश चिवटे यांच्या हस्ते या प्रभागाचे उद्घाटन करण्यात आले.

मेडिकवर हॉस्पिटल्सच्या माध्यमातून हे आतापर्यंत कर्करुग्णांना आजतगायत उच्च दर्जाच्या आरोग्य सेवा प्रदान करण्यात आल्या आहेत. उपचार घेत असलेल्या रुग्णांचे आरोग्य आणि जीवनमान सुधारण्यासाठी रुग्णालयाने आता आणखी एक पाऊल पुढे टाकत केमो डे केअर वॉर्ड सुरू केला आहे. रूग्णालयाने घेतलेल्या प्रयत्नांमुळे कर्करोगाच्या रूग्णावर उच्च दर्जाचे व यशस्वी उपचार केले जातील अशी प्रतिक्रिया मंगेश चिवटे यांनी व्यक्त केली. याठिकाणी थेरेपी घेणाऱ्या सर्व कर्करुग्णांना मुख्यमंत्री सहायता निधीच्या माध्यमातून ५० हजार रुपयांची आर्थिक मदत तर कर्करोगासंबंधीत शस्त्रक्रिया करणाऱ्या रुग्णांना १ लाख रुपयांची आर्थिक मदत करणार असल्याची घोषणा यावेळी करण्यात आली. अवयव प्रत्यारोपणासारख्या गुंतागुंतीच्या शस्त्रक्रियेसाठी मुख्यमंत्री सहायता निधीच्या माध्यमातून २ लाख रुपयांची मदत केली जाणार असल्याची प्रतिक्रिया चिवटे यांनी व्यक्त केली.

नवीन डे केअर वॉर्ड हे कर्करोगाच्या रूग्णांसाठी उपचार पद्धती बदलत आहे. हा वॉर्ड रुग्णांसाठी सोयी आणि आराम या दोन्ही गोष्टींना प्राधान्य देतो. केमोथेरेपी घेतल्यानंतर त्याच दिवशी ते घरी जाऊ शकतात हे रुग्णांना दिलासा देणारे आहे. वॉर्ड रुग्णांना आणि त्यांच्या प्रियजनांना केमोथेरपी-संबंधित दुष्परिणामांना प्रतिबंध आणि व्यवस्थापनाबाबत शिक्षित करेल. हॉस्पिटलमध्ये केमोथेरपी घेत असलेल्या आणि प्रमाणापेक्षा जास्त केस गळत असणाऱ्या रुग्णांना केमो कॅप्स दिल्या जातील अशी प्रतिक्रिया डॉ डोनाल्ड जॉन बाबू यांनी व्यक्त केली. मेडिकवर हॉस्पिटलचे प्रयत्न हे केवळ रोगावर उपचार करण्यासाठीच नव्हे तर,या आव्हानात्मक काळात रुग्णांना होणारा त्रास, त्यांची गैरसोय कमी करण्याचा देखील प्रयत्न केला जात असल्याचे डॉ. माताप्रसाद गुप्ता यांनी सांगितले.

### सामानाची चोरी

**नवीन पनवेल :** चहा अल्पोपहाराच्या दुकानाचा दरवाजा तोडून चोराने गॅस सिलिंडर, बिस्कीटचे पुडे असा एकूण १८ हजार पाचशे रुपये किमतीचा ऐवज चोरून नेला. या प्रकरणी तळोजा पोलीस ठाण्यात बीएनएस कलम ३०५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. सत्यवान शिंदे हे वावंजे गाव, देवी गार्डन सोसायटी येथे राहतात. त्यांची हिंदालको कंपनीच्या गेट नंबर दोन जवळ तोंडरे गावचे हद्दीत पाणी पाण्याच्या टाकीजवळ चहा आणि अल्पोपहाराचे लहान दुकान आहे. ते दुकान बंद करून घरी गेले. दोन सप्टेंबर रोजी त्यांना दुकानाचे दरवाजा उघडा दिसला. त्यावेळी पाहिले असता दोन गॅस सिलिंडर आणि इतर साहित्याची चोरी झाल्याचे समजून आले.

### डिझेलची चोरी

**नवीन पनवेल :** एसटीमधून डिझेलची चोरी केल्याप्रकरणी तीन अनोळखी इसमाविरोधात खारघर पोलीस ठाण्यात बीएनएस कलम ३०३(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

उदय मोरेश्वर जोशी हे महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ मध्ये चालक म्हणून नोकरी करतात. ४ सप्टेंबर रोजी सायंकाळी साडेपाचच्या सुमारास गुहागर ते मुंबई (बस क्रमांक एमएच २० बी एल १५६८) गौरी गणपती ज्यादा वाहन असे कर्तव्य नेमले असता त्यांच्यासोबत दिलीप रिंडे व शिवानंद घुगे यांची नेमणूक करण्यात आली. ते फ्रेश होण्यासाठी त्यांनी खारघर टोल नाका येथे पहाटे साडेतीन वाजता गाडी थांबवली व ते गाडीतून खाली उतरले. ते गाडीपासून काही अंतरावर बोलत थांबले असताना पांढऱ्या रंगाची मारुती सुझुकी एर्टिगा गाडीत दोन-तीन इसम अंगात शर्ट न घातलेले उघड्या अवस्थेत खाली उतरले. आणि डिझेल गाडीतून डिझेल चोरी करत होते. ते डिझेल चोरी करत असताना आरडाओरडा करण्यात आली. यावेळी ते त्यांचे एर्टिगा कार भरधाव वेगाने घेऊन पळून गेले. १४० लिटर डिझेलची चोरी केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला.

# दूंदरे ग्रामपंचायतीकडून लॅपटॉप वाटप



**। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।**

शिक्षक दिनाचे औचित्य साधून शिक्षकांचा सत्कार करण्यात आला. दूंदरे ग्रामपंचायत हद्दीतील चिंचवली, रिटघर, दूंदरेपाडा, शिवनसई, दूंदरे या ५ शाळेला सरपंच सुभाष भोपी यांच्या हस्ते लॅपटॉपचे वाटप करण्यात आले.

शाळेचे मुख्याध्यापक शिक्षक प्रतिभा बाळासाहेब नाईक, शाळा शिवणसई, राहुल महादेव लव्हे शाळा चिंचवली, संतोष तुकाराम पाटील शाळा दुंदरेपाडा, अर्चना अविनाश डांगरे शाळा दुंदरे यांच्या ताब्यात लॅपटॉप देण्यात आले.

यावेळी सरपंच सुभाष पुंडलिक भोपी, माजी सरपंच भारत भोपी, सदस्य विश्वास पाटील, सदस्य शांताराम चौधरी, पांडुरंग भोपी, देविदास भोपी, किशोर थळे, रिटघर हायस्कूलचे साळुंके, अमित पाटील, ग्रामसेवक बाळासाहेब सरडे, सदस्य प्रलय भोपी तसेच शिक्षक आदी उपस्थित होते.

SARASWATI EDUCATION SOCIETY'S
**YADAVRAO TASGAONKAR Institute of Engineering and Technology**
Approved by AICTE & DTE, Affiliated to University of Mumbai
At. Chandhai, Post-Nasrapur, Tal: Karjat, Dist: Raigad, Pin code: 410201
www.ytiet.com, principal.ytiet@tasgaonkartech.com

**ADMISSION NOTIFICATION Against Cap Vacancy (ACAP)**

**Applications are invited for Admission to First Year Master of Engineering (ME) and Master of Management Studies Against Cap Vacancy (ACP) for various courses for academic year 2024-25.**

| Sr. No | Name of Course | Course Code | Vacant Seats |
|---|---|---|---|
| 1 | Computer Engineering (M.E.) | 314724510 | 13 |
| 2 | Electrical Power System (M.E.) | 314729210 | 10 |
| 3 | Mechanical Engineering Design (M.E.) | 314790410 | 11 |
| 4 | Master of Management Studies (M.M.S.) | 314710210 | 47 |

The schedule of admission procedure is as follows,
1) Sale of Information Brochure and application form at Office: **09.00 am to 4.00 pm from 04th of September 2024 to 09th of September 2024.**
2) Submission of Completely filled application form: **10.00 am to 4.00 pm from 04th of September 2024 to 09th of September 2024.**
3) Display of Provisional Merit List on Notice Board and Institute Website: **03.00 pm on 10th September 2024.**
4) Sale of Admission form: **09.00 am to 03.00 pm from 11th of September 2024 to 12th September 2024.**
5) Reporting to the Institute by submitting completely filled admission form with relevant documents: **10.00 am to 05.00 pm from 11th of September 2024 to 12th September 2024.**
6) Cost of Information Brochure with Admission form: **INR 300/- only**.

For any queries contact to **9967640120 / 7972583349**

Sd/
Principal
Yadavrao Tasgaonkar Inst. Of Engg. & Technology

SARASWATI EDUCATION SOCIETY'S
**Yadavrao Tasgaonkar College of Engineering and Management**
Approved by AICTE & DTE, Affiliated to University of Mumbai
At. Chandhai, Post-Nasrapur, Tal: Karjat, Dist: Raigad, Pin code: 410201
www.ytcem.com, principal.ytcem@tasgaonkartech.com

**ADMISSION NOTIFICATION Against Cap Vacancy (ACAP)**

**Applications are invited for Admission to First Year Master of Engineering (ME) Against Cap Vacancy (ACAP) for various courses for academic year 2024-25.**

| Sr. No | Name of Course | Course Code | Vacant Seats |
|---|---|---|---|
| 1 | Water Resource Engineering (M.E.) | 322019710 | 13 |
| 2 | Computer Engineering (M.E.) | 322024510 | 10 |
| 3 | Signal Processing (M.E.) | 322035810 | 13 |
| 4 | Mechanical Engineering- Product Design and Dev. (M.E.) | 322069610 | 12 |

The schedule of admission procedure is as follows,
1) Sale of Information Brochure and application form at Office: **09.00 am to 4.00 pm from 04th of September 2024 to 09th of September 2024.**
2) Submission of Completely filled application form: **10.00 am to 4.00 pm from 04th of September 2024 to 09th of September 2024.**
3) Display of Provisional Merit List on Notice Board and Institute Website: **03.00 pm on 10th September 2024.**
4) Sale of Admission form: **09.00 am to 03.00 pm from 11th of September 2024 to 12th September 2024.**
5) Reporting to the Institute by submitting completely filled admission form with relevant documents: **10.00 am to 05.00 pm from 11th of September 2024 to 12th September 2024.**
6) Cost of Information Brochure with Admission form: **INR 500/- only**.

For any queries contact to **8862023274 / 9325831661**

Sd/
Principal
Yadavrao Tasgaonkar College of Engineering and Management

### वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**

*१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स*



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की सचिन पद्माकर पाटील, रा. घर नं. १९६ पनवेल माथेरान रोड, अपेक्षा कॉम्प्लेक्स जवळ, माळवाडी आकुर्ली ता.पनवेल, जि.रायगड यांनी मौजे पाटणी पांडापुर, ता.पेण, जि.रायगड येथील जयश्री संजय म्हात्रे, जनाबाई कृष्णा पाटील, उषा रामचंद्र नाकटिळक, सुनंदा भुपेंद्र तांडेल, निखिल भुपेंद्र तांडेल, तेजस्विनी विनोद सोनार यांच्या मालकीची मिळकत कायमस्वरुपी मी विकत घेण्याचे ठरविले आहे, त्याचे वर्णन खालीलप्रमाणे...

| गाव | मालक | गट क्रमांक व उपविभाग | भुधारणा पद्धती | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|---|---|
| पाटणी पांडापूर | जयश्री संजय म्हात्रे व इतर पाच | ११८/१/अ | भोगवटादार वर्ग २ | ०-४८-००<br>एकूण ०-४८-०० | ७.२९ |

वर वर्णन केलेली जमिन मिळकत मी स्वता: कायमस्वरूपी विकत घेत आहे. तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचीही कुळ, वहीवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, खरेदीखत, गहाणखत, बोजा, भाडेपट्टा, मृत्युपत्रातील दान, जप्ती, लीज अथवा अन्य प्रकारची कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटिस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसाच्या आत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी येवून माझी खात्री पटवून द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास मी स्वत: जमिन मिळकतीचे रजिस्टर्ड खरेदीखत करेल व मागाहुन येणारी कोणतीही हरकत माझ्यावर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

पेण
दि. ०९/०९/२०२४

**सचिन पद्माकर पाटील,**
पत्ता घर नं. १९६, पनवेल माथेरान रोड,
अपेक्षा कॉम्प्लेक्स जवळ, माळवाडी
आकुर्ली, पनवेल, रायगड
महाराष्ट्र, ४१०२०६
मो. ९९२०४९४१९३

### जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे वारे, ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली जमीन मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक संतोष मोतीराम नावरे यांचेकडुन विकत घेण्याचे ठरविले आहे सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मौजे वारे, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर. पॉ.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| २१ | २१ / ब | ०-११-०० | ०-०६ |

तरी वरील मिळकतीच्या बाबत कोणाचाही कुळ वहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बक्षीस, बोजा, भाडेपट्टा, मृत्युपत्रांकित दान, जप्ती, लिज, कुलअखत्यारपत्र अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत खालील सही करणार अॅडव्होकेट यांचेकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी दाखल कराव्यात अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदरचा व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता. ०८/०९/२०२४

खरेदीदारातर्फे अॅडव्होकेट
**किशोर तुकाराम देशमुख**
प्रेरणा निवास, नाना मास्तर नगर,
मुद्रे खुर्द, ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१
मो.९४२२०६८७५५

### पेण प्राथमिक शिक्षक सहकारी पतपेढी लि. पेण
### आचार्य मो.वा दोंन्दे मार्ग शिक्षक मित्र सहकार नगर शिक्षक सोसायटी पेण
### कर्मचारी भरती २०२४

पेण प्राथमिक शिक्षक सहकारी पतपेढी लि.पेण रायगड या संस्थेच्या पेण कार्यालयात व शाखा कार्यालयात १ लेखनिक व एक संगणक तज्ञ व एक शिपाई पदाच्या जागा हंगामी करार पध्दतीने तीन वर्ष उक्ते पगारावर भरावयाच्या आहेत लेखनिक तीन वर्ष उक्ते पगार १५,०००/- व शिपाई तीन वर्ष उक्ते पगार १०,०००/-व संगणक तज्ञ उक्ते पगार २०,०००/- रू. प्रतिमहा मानधनावर खालील अटीनुसार भरावयाच्या आहेत तरी खालील पात्रता असणाऱ्यांनी दिनांक २०/०९/२०२४ पर्यत संस्थेच्या पेण कार्यालयात कार्यालयीन वेळेत अर्ज करावेत अर्जाचा नमुना पेण कार्यालयात २००/- रूपये फी भरून मिळेल.

पद:-लेखनिक १-सवर्ग- ओ.बी.सी./ एन.टी/एस.सी/एस.टी. सर्वसाधारण

पद:-शिपाई १-सवर्ग- ओ.बी.सी./ एन.टी/एस.सी/एस.टी. सर्वसाधारण

पद:- संगणक तज्ञ १ सवर्ग- ओ.बी.सी./ एन.टी/एस.सी/एस.टी. सर्वसाधारण

१) लेखनिक पद- शैक्षणिक पात्रता-वाणिज्य शाखेचा पदविधर (बी कॉम) पास
२) महाराष्ट्र शासनाची एम.एस.सी.आय.टी. संगणक परिक्षा पास
३) महाराष्ट्र शासनाची टंकलेखन मराठी व इंग्रजी प्रती मिनिट ३० शब्दगतीने पास असणे आवश्यक आहे.
४) सहकार पदविका परिक्षा एल.डी.सी/डि.सी.एम परिक्षा पास असणे आवश्यक आहे.
५) दिनांक ०१-०९-२०२४ रोजी उमेदवाराचे वय १८ वर्ष पुर्ण असावे व ३५ वर्षापेक्षा जास्त नसावे कामाचा अनुभवास प्राधान्य देण्यात येईल प्रोवेशन कालावधी ३ वर्ष राहील.
१) शिपाई पद शैक्षणिक पात्रता-किमान १० वी पास असणे आवश्यक आहे प्रोवेशन कालावधी ३ वर्षे राहील. उमेदवाराचे वय १-९-२०२४ रोजी १८ वर्षे पूर्ण व ३५ वर्षापेक्षा जास्त नसावे.
१) संगणक तज्ञ-उमेदवार सॉफ्टवेअर इंजीनियर मधील पदवी किंवा पदवीकाधारक असावा. पतसंस्थाच्या सॉफ्टवेअर कामाचा २ वर्षाचा अनुभव असावा/सहकार क्षेत्रातील कामाचा अनुभव असावा/महाराष्ट्र शासनाची एम.एस. सी.आय.टी संगणक परिक्षा व महाराष्ट्र शासनाची टंकलेखन मराठी व इंग्रजी प्रती मिनिट ३० शब्दगतीने पास असणे आवश्यक आहे. प्रोवेशन कालावधी ३ वर्षे राहील. उमेदवाराचे वय १-९-२०२४ रोजी १८ वर्षे पूर्ण व ३५ वर्षापेक्षा जास्त नसावे.

**टिप :-** कर्मचारी भरती करण्याचे सर्व अधिकार संचालक मंडळाकडे राहतील.

**श्री. मोहन बाळाराम भोईर** — **चेअरमन**
**श्रीम.उज्वला जगन्नाथ कनोजे** — **व्हा. चेअरमन**
**श्री. सोपान रामचंद्र चांदे** — **मानद सचिव**
**श्री. नितिन वसंत वर्तक** — **सेक्रेटरी**
**पेण प्राथमिक शिक्षक सहकारी पतपेढी लि. पेण**

# कृषीवल गणेश दर्शन स्पर्धा २०२४



● श्री. मोहन कृष्णा धुमाळ रा.चिखली यांच्या निवासस्थानी विराजमान गणपती बाप्पा. ( छायाचित्र : जीवन पाटील, भाकरवड)




● श्री संदेश लक्ष्मण म्हात्रे-चोंढी यांच्या निवासस्थानी विराजमान गणरायाचे दर्शन घेताना किहीम सरपंच पिंट्या गायकवाड व त्यांचे सहकारी. (छायाचित्र - अब्दुल सोगावकर)



● श्री.प्रविण शंकर मोहिते-किहीम यांच्या घरी इकोफ्रेंडली गणपतीचे दर्शन घेताना सरपंच पिंट्या गायकवाड व सुदेश सावंत. (छायाचित्र-अब्दुल सोगावकर)



● चोंढी येथील उद्योजक अमित मोरे, बंधू मोरे यांच्या निवासस्थानी विराजमान गणरायाचे दर्शन घेताना किहीम सरपंच पिंट्या गायकवाड.(छायाचित्र-अब्दुल सोगावकर)



● आई फाउंडेशन चे संस्थापक श्री राजू साळुंखे चोंढी यांच्या निवासस्थान श्री गणपती बाप्पांचे आकर्षक मूर्ती विराजमान झाली असून विविध फुलांची आकर्षक सजावट करण्यात आली समस्त परिवार व विविध मान्यवरांनी दर्शनाचा लाभ घेतला. (छायाचित्र - महेंद्र म्हात्रे)



● श्री. मनोज श्रीराम काठे किहीम-कामथ यांच्या निवासस्थानी विराजमान गणरायाचे दर्शन घेताना सरपंच पिंट्या गायकवाड व सुदेश सावंत. (छायाचित्र-अब्दुल सोगावकर)



● श्री. निशांत विजय काठे किहीम-कामथ यांच्या निवासस्थानी विराजमान गणरायाचे दर्शन घेताना सरपंच पिंट्या गायकवाड व सुदेश सावंत. (छायाचित्र-अब्दुल सोगावकर)



● श्री. स्वप्निल सुरेश काठे किहीम-कामथ यांच्या निवासस्थानी विराजमान गणरायाचे दर्शन घेताना सरपंच पिंट्या गायकवाड व सुदेश सावंत. (छायाचित्र-अब्दुल सोगावकर)



● अलिबाग शहरातील प्रसिद्ध वकील अंकित बंगेरा यांच्या निवासस्थानी विराजमान गणपतीचे दर्शन घेताना आई फाऊंडेशनचे सागर पवार आणि किहीम सरपंच पिंट्या गायकवाड. (छायाचित्र - अब्दुल सोगावकर)




● ॲड. परेश देशमुख यांच्या हातनोली निवासस्थानी जेजुरी गडाचा देखावा.

# विनेशला नोटीस

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

कुस्तीपटू विनेश फोगाट गेल्या काही दिवसांपासून सातत्याने चर्चेत आहे. नुकतेच गेल्या आठवड्यात तिचे पदक थोडक्यात हुकले होते. यानंतर तिने कुस्तीतून निवृत्तीही घेतली. आता दोनदिवसांपूर्वीच तिने राजकारणाच्या आखाड्यात प्रवेश केला आहे. तिने कुस्तीपटू बजरंग पुनियासह काँग्रेस पक्षात प्रवेश केला आहे. यानंतर लगेचच तिला हरियाणातून काँग्रेसने आगामी विधानसभेसाठी उमेदवारीही दिली आहे. अशातच आता रेल्वेकडून विनेशला कारण दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. याबाबत उत्तर रेल्वेच्या अधिकाऱ्यांकडून पुष्टी करण्यात आली आहे. कारण विनेश रेल्वेमध्ये नोकरीला होती.

उत्तर रेल्वेच्या अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार ४ सप्टेंबर २०२४ रोजी तिला ही कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली होती. गेल्या काही दिवसांपासूनच विनेश काँग्रेस पक्षात प्रवेश करणार असल्याची चर्चा होती. तिने राहुल गांधी यांची भेटही घेतली होती. अधिकाऱ्याने पुढे सांगितले की, ती सरकारी कर्मचारी असल्याने ती राजकीय पक्षात सामील होणे हा सेवा नियमांचे उल्लंघन आहे. त्यामुळे तिला तिची भूमिका स्पष्ट करण्यास सांगण्यात आले आहे. तथापि काँग्रेस नेते केसी वेणुगोपाल यांनी शुक्रवारी आरोप केला की विनेशने रेल्वेचा राजीनामा दिल्यानंतर त्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली होती. मात्र, रेल्वेचे सीपीआरओ हिमांशू उपाध्याय यांनी हा आरोप फेटाळला आहे.

## दीप्ती जीवनवर बक्षीसांची खैरात

**। पॅरिस । वृत्तसंस्था ।**

पॅरिस पॅरालिम्पिकमध्ये कांस्यपदक जिंकणाऱ्या दीप्ती जीवनजीला तेलंगणा सरकारने १ कोटी बक्षीस, द्वीतीय श्रेणीतील नोकरी आणि वारंगलमध्ये ५०० चौरस यार्ड जमीन देण्याचे जाहीर केली आहे.

तेलंगणाचे मुख्यमंत्री ए. रेवंथ रेड्डी यांनी अधिकाऱ्यांना बक्षीसे सादर करण्याचे निर्देश दिले आहेत आणि तिचे प्रशिक्षक, द्रोणाचार्य पुरस्कार विजेते एन. रमेश यांनाही १० लाख रूपयांचे बक्षीस जाहीर केले आहे.

दीप्तीच्या पॅरालिम्पिकमध्ये खेळण्याया स्वप्नासाठी तिच्या रोजंदारीवर काम करणाऱ्या पालकांनी आठ वर्षांपूर्वी वारंगलमधील कल्लेडा येथील अर्धा एकर जमीन विकली होती. जी की दीप्तीने आपल्या कमाईमधून परत विकत घेतली आहे. परंतु, दीप्तीच्या आर्थिक सहकार्यासाठी तिच्या पालकांनी केलेल्या या त्यागाबद्दल सरकारने तिला वारंगलमध्ये ५०० चौरस यार्ड जमीन जाहीर केली आहे.

# कसोटीसाठी भारतीय संघाचे दार ठोठावले



## दुलीप ट्रॉफीत आकाश चमकला

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

दुलीप ट्रॉफी स्पर्धेत भारत 'अ' विरुद्ध भारत 'ब' संघात सामना होत आहे. या सामन्यात 'अ' संघाचा वेगवान गोलंदाज आकाश दीप चमकला आहे. त्याने या संपूर्ण सामन्यात ९ बळी घेतले आहेत. आकाश दीपच्या कामगिरीमुळे आता त्याने बांगलादेशविरुद्धच्या कसोटी मालिकेसाठी संघाचे दारंही ठोठावले आहे.

भारताची बांगलादेशविरुद्ध कसोटी मालिका सुरू होणार आहे. या मालिकेसाठी अद्याप भारतीय संघाची निवड झालेली नाही. ही निवड येत्या आठवड्यात होऊ शकते. या मालिकेत भारताचा अनुभवी वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह खेळणार नसल्याची शक्यता आहे. त्याला या मालिकेसाठी विश्रांती दिली जाणार असल्याची चर्चा आहे. यामुळे जर त्याला विश्रांती देण्यात आली, तर याच्या जागेवर आकाश दीपचा विचार केला जाऊ शकतो.

'ब' संघाने प्रथम फलंदाजी करताना ११६ षटकात सर्वबाद ३२१ धावा केल्या होत्या. या संघाकडून मुशीर खानने सर्वाधिक १८१ धावांची खेळी केली, तर नवदीप सैनीने ५६ धावांची खेळी केली होती. यानंतर 'अ' संघाला पहिल्या डावात ७२.४ षटकात सर्वबाद २३१ धावा करता आल्या. यामुळे 'ब' संघाने ९० धावांची आघाडी घेतली होती. यानंतर दुसऱ्या डावात 'ब' संघ ४२ षटकात अवघ्या १८४ धावांवर सर्वबाद झाला.

## कोहलीची ८४७ कोटींची कमाई

**नवी दिल्ली :** १ सप्टेंबर २०२३ ते १ सप्टेंबर २०२४ दरम्यान सर्वाधिक कमाई करणाऱ्या खेळाडूंची यादी जाहीर केली आहे. पोर्तुगल फुटबॉलपटू ख्रिस्तियानो रोनाल्डो सध्या जगातील सर्वाधिक कमाई करणारा खेळाडू म्हणून अव्वल स्थानावर आहे. गेल्या वर्षभरात या दिग्गज खेळाडूने तब्बल २०८१ कोटींची कमाई केली आहे. जॉन रहम या स्पॅनिश गोल्फरने यादीत दुसरे स्थान तर लिओनेल मेस्सी तब्बल १०७४ कोटी रुपयांची कमाई करत तिसऱ्या स्थानी आहे. तसेच, भारतीय स्टार क्रिकेटपटू विराट कोहली हा भारतातील सर्वाधिक कमाई करणारा खेळाडू असून जगात नवव्या स्थानावर आहे. विराटने तब्बल ८४७ कोटी रुपयांची कमाई केली आहे.

## मोईन अलीची निवृत्ती

**लंडन :** इंग्लंडचा अष्टपैलू खेळाडू मोईन अलीने सर्वप्रकारच्या क्रिकेटमधून अचानक निवृत्तीची घोषणा केली आहे. मोईन अलीने म्हटले आहे की, मी आता ३७ वर्षांचा आहे आणि या महिन्यात ऑस्ट्रेलियाविरुद्ध होणाऱ्या मालिकांसाठी माझी इंग्लंड संघात निवड झालेली नाही. मी इंग्लंडसाठी खूप क्रिकेट खेळलो आहे. आता पुढच्या पिढीची वेळ आहे, हेच मलाही समजवण्यात आले. मलाही ते योग्य वाटले. मी माझे योगदान दिले आहे.

# इंग्लंड संघाला मोठा धक्का

**। इंग्लंड । वृत्तसंस्था ।**

इंग्लंड संघ सध्या श्रीलंकाविरुद्ध कसोटी मालिका खेळत आहे. ही मालिका सुरू असतानाच इंग्लंडला मोठा धक्का बसला आहे. इंग्लंडचा अनुभवी वेगवान गोलंदाज मार्क वूडला यंदाच्या उर्वरित वर्षात क्रिकेट खेळता येणार नाही. मार्क वूड सध्या कोपराच्या दुखापतीमुळे त्रस्त आहे. खरंतर श्रीलंकेविरुद्धच्या कसोटी मालिकेतील पहिल्या सामन्यात झालेल्या उजव्या मांडीच्या दुखापतीमुळे त्याला दुसऱ्या आणि तिसऱ्या सामन्यात




खेळता आले नव्हते. यानंतर त्याने त्याच्या जॉइंट्समध्ये काहीशा वेदना होत असल्याने रुटीन स्कॅन केले. यामध्ये त्याच्या कोपराची दुखापत गंभीर असल्याचे समोर आले आहे.

मार्क वूडने एका पोस्टमध्ये लिहिले की, माझ्या आधीच्या त्रासासाठी मी रुटीन चेकअप करताना काय विचार केला होता, पण जेव्हा मला कळाले की माझ्या उजव्या कोपराला बोन स्ट्रेबस आहे, तेव्हा मी चकीत झालो. श्रीलंकेविरुद्ध ओल्ड ट्रॅफर्ड कसोटीत मला मांडीची छोटी दुखापत झाली. त्यावेळी मला आणि मेडिकल टीमला वाटले की माझ्या कोपराचीही तपासणी करावी, ज्याचा मला थोडा त्रास होत होता. यानंतर त्याने असेही म्हटले की, तो अनेक दुखापतींचा सामना केल्यानंतर खेळत आहे.

## सुवर्णपदक जिंकणाऱ्या खेळाडूवर अपात्रतेची कारवाई

# भारताच्या नशिबी सुवर्ण

**। पॅरिस । वृत्तसंस्था ।**

**पॅरिस पॅरालिम्पिक स्पर्धेत शनिवारी (दि.७) आश्चर्याची गोष्ट घडली. पुरुषांच्या भालाफेकीच्या ४१ गटात नवदीप सिंगने रौप्यपदक जिंकून दिले होते. परंतु, या स्पर्धेत सुवर्णपदक जिंकणाऱ्या इराणच्या खेळाडूवर अपात्रतेची कारवाई केली गेली आणि नवदीपच्या रौप्यपदकाचे रुपांतर सुवर्णमध्ये झाले. यामुळे भारताने ७ सुवर्ण, ९ रौप्य आणि १३ कांस्यसह एकूण २९ पदके जिंकली आहेत. सध्या भारत पदकतालिकेत १८व्या क्रमांकावर आहे.**

हरयाणाच्या नवदीपला २०२०च्या पॅरालिम्पिक स्पर्धेत ४१ प्रकारात चौथ्या क्रमांकावर समाधान मानावे लागले होते. शनिवारी त्याने तिसऱ्या प्रयत्नात ४७.३२ मीटरसह पॅरालिम्पिक विक्रमाची नोंद केली. चीनच्या सून पेंगिझिआंगचा २०२१मध्ये टोकियोतील ४७.१३ मीटरचा पॅरालिम्पिक विक्रम नवदीपने मोडला. इराणच्या सयाह सहेघ बेतने त्याच्या दुसऱ्या प्रयत्नात ४६.८४ मीटर अंतर पार करून अव्वल स्थान जिंकले होते. नवदीपने त्याला मागे टाकले. पण, इराणच्या बेतने त्याच्या पाचव्या प्रयत्नात ४७.६४ मीटर भालाफेकून भारतीय खेळाडूचा पॅरालिम्पिक विक्रम मोडला आणि अव्वल स्थान काबीज केले. त्याचवेळी त्याला पंचांनी पिवळे कार्ड दाखवून वॉर्निंग दिली होती. नवदीपचा सहावा प्रयत्न फाऊल ठरल्याने इराणी खेळाडूचे सुवर्ण अन् भारताचे रौप्यपदक पक्के झाले आणि चिनी खेळाडूला कांस्यपदक मिळाले होते.




सामन्यानंतर इराणच्या खेळाडूला ८.१ या नियमानुसार अखिलाडूवृत्ती किंवा चुकीच्या कृतीमुळे अपात्र ठरवले गेले. त्याला नेमकं कोणत्या कारणावरून अपात्र ठरवले गेले, हे मात्र स्पष्ट झालेले नाही. इराणी खेळाडूला अपात्र ठरवल्याने नवदीपचे रौप्य सुवर्ण झाले अन् चीनच्या सूनचे कांस्य रौप्यपदक झाले.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)